संदर्भ ग्रंथसूची :-

१) **आंबेडकर बी.आर., भारत का संविधान, संमेक प्रकाशन**
२) प्रा. खंडारे संजय, **भारतीय राज्यघटना, अंजू पब्लिकेशन औरंगाबाद**
३) सिंह आनन्दी, **भारत की राष्ट्रीय एकता और शिक्षा,**
४) https://www.nls.ac.in

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

RESEARCH NEBULA
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
**RESEARCH NEBULA**
*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

Indexed in the ICI Journals Master List
J-Gate INDEXED
ISSN 2277-8071
DOI PREFIX 10.22183
INDEX COPERNICUS INTERNATIONAL

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

Impact Factor 8.137

**One Day National Interdisciplinary Conference on**

# The 75th Anniversary of the Indian Constitution:

## Achievements, Challenges, Impact, Relevance and Significance

**On 30th August, 2025**

**Organized by**

***Bhartiya Seva Sadan's***

# Smt. Radhadevi Goenka College for Women

*Akola, Maharashtra*

**SPECIAL ISSUE**

**Special Issue Published on 30th August, 2025**

**www.ucjournal.net**



Scanned with OKEN Scanner

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
www.ycjournal.net


| | | | |
|---|---|---|---|
| 69. | प्रा. डॉ. सुरेश ल. पंडित | "भारतीय संविधानाची 75 वर्ष व वर्तमान काळातील त्यापुढील आव्हाने" | 444 |
| 70. | सहा.प्रा.डॉ.प्रतिभा सुभाषराव काटकर | भारतीय संविधानाचे गृहअर्थशास्त्र शिक्षणातील योगदान | 450 |
| 71. | डॉ. होमराज टी. राठोड | दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी संविधानाचे योगदान | 457 |
| 72. | वर्षा पतके थोटे | मराठी कविता आणि संविधान मूल्ये | 465 |
| 73. | प्रा विजय आठवले | प्राचीन भारतातील गणराज्य व लोककल्याणकारी शासन व्यवस्था | 473 |
| 74. | डॉ. प्रदीप पंजाबराव येवले | भारतीय लोकशाहीची 75 वर्षांची आव्हानात्मक वाटचाल एक अभ्यास | 477 |
| 75. | प्रा. पुरुषोत्तम एस. निर्मळ | केशवसुतांच्या कवितेतील सामाजिक समता आणि बंधुभाव | 483 |
| 76. | डॉ. संकेत सुरेशराव काळे | राष्ट्रीय एकात्मतेमध्ये भारतीय संविधानाची भूमिका | 488 |
| 77. | डॉ. अनिल रा. कडू | भारतीय संविधान निर्मितीमध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | 491 |
| 78. | प्रा. डॉ.नीलिमा विजयराव दवणे.<br>माणिक आत्माराम पट्टेबहादूर. | राष्ट्रीय एकात्मतेत संविधानाची भूमिका | 498 |
| 79. | डॉ. जगदीश दयासागर हेंडवे | प्राचीन भारतीय प्रजासत्ताक राज्य | 504 |
| 80. | श्री. सुमित सुनिलदत्त गवरे<br>डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | भारतीय संविधान मुलभूत वैशिष्ट्ये | 509 |
| 81. | प्रा.अरुणा काळपांडे (हरले) | भारतीय संगीतातील विविधतेत एकता : संविधानिक आदर्शांचे प्रतिबिंब | 516 |
| 82. | प्रा. डॉ. कल्पना गोरले/थोरात | भारतीय संविधान आणि कवी नामदेव ढसाळ यांची कविता: एक दृष्टिक्षेप | 520 |
| 83. | डॉ.वासुदेव भगत | सामान्यांना असामान्यत्व बहाल करणारा प्रलेख: भारतीय संविधान | 526 |
| 84. | प्रा. डॉ. बंडू एस. मानवटकर | "पाली साहित्यात स्वातंत्र्य समता बंधुता व न्याय संकल्पना" | 529 |
| 85. | प्रा. डॉ. पोर्णिमा गो. वाकपांजर | राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षण आणि संविधान | 534 |
| 86. | मीनाकुमारी गंगाराम काळे<br>डॉ. नीलिमा विजयराव दवणे | आदर्श सामाजिक न्याय आणि मूल्य प्रणालीसाठी भारतीय संविधानाचे महत्त्व: एक शोधनिबंध | 537 |
| 87. | डॉ. नामदेव भिला माळी | संत तुकाराम महाराज यांच्या साहित्यातील सामाजिक विचार | 541 |
| 88. | प्रा.डॉ.प्रेमसिंग प्रल्हाद जाधव | भारतीय संविधान आणि उपेक्षीत वर्ग | 549 |
| 89. | डॉ. राधिका सुभाषराव धोत्रे. | आधुनिक भारतीय लोकशाहीचे प्राचीन स्त्रोत | 554 |
| 90. | डॉ. पुरुषोत्तम रामराव बांडे | भारतीय समाजातील उपेक्षित गटासाठी संवैधानिक संरक्षण : एक समाजशास्त्रीय अध्ययन | 559 |
| 91. | संदेश मधुकर धाडसे<br>डॉ. विनोद खैरे | भारतीय संविधानिक यंत्रणा कार्य आणि भूमिका : एक अभ्यास | 566 |




College Code 225

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in
Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

One Day National Interdisciplinary Conference on
THE 75th ANNIVERSARY OF THE INDIAN CONSTITUTION:
ACHIEVEMENTS, CHALLENGES, IMPACT, RELEVANCE AND SIGNIFICANCE
On 30th August, 2025

Bhartiya Seva Sadan's
SMT. RADHADEVI GOENKA COLLEGE FOR WOMEN,
Akola, Maharashtra.

# भारतीय संविधान आणि उपेक्षीत वर्ग

**प्रा.डॉ.प्रेमसिंग प्रल्हाद जाधव**
सहाय्यक प्राध्यापक
श्रीमती पंचफुला देवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, जि.अकोला
Mob. 7840984475
Email: Premsingjadhao@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतीय संविधान हे सामाजिक न्याय, समता आणि मानवतेचे मूल्यमान्य तत्त्व मानणारे एक प्रगत आणि सर्वसमावेशक दस्तऐवज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली बनवलेले हे संविधान विशेषतः समाजातील उपेक्षित, वंचित आणि दुर्बल घटकांच्या हक्काला संरक्षण देण्याचे कार्य भारतीय संविधानाने केले आहे. उपेक्षित वर्गामध्ये अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), इतर मागासवर्गीय (OBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), महिला, दिव्यांग आणि अल्पसंख्याक समाज यांचा समावेश होतो. भारतीय समाजव्यवस्थेत या वर्गांना संविधानो कशाप्रकारे संरक्षण दिले आहे. याबाबत चर्चा प्रस्तुत शोधनिबंधात केली आहे.

**संविधानाची निर्मिती :**

15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला आणि 29 ऑगस्ट 1947 ला संविधान सभेच्या मसुदा समितीचे स्थापना करण्यात आली. ज्याचे अध्यक्ष होण्याचा मान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देण्यात आला. या समितीत आणि सहा सभासदांना सामिल करण्यात आले. डॉ. बाबासाहेबांना सविधान निर्मितीच्या मसुदा समितीचे अध्यक्षपद मिळणे ही एक विस्मयकारक घटना होती. ज्या हिन्दू व्यवस्थेने ज्या समाजाला पिढ्यान पिढ्या पासून तिरस्काराची वागणूक दिली, अपमान केला त्याच समाजाचा व्यक्ती देशाची घटना लिहणार हा खरच एक सन्मानित



College Code 225

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in
Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

आणि ऐतिहासक प्रसंग होता. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या समितीचे अध्यक्षपद मिळणे हा केवळ त्यांच्या जातीचाच सन्मान होता असे नाही तर त्यांच्या बुध्दीचा सन्मान देखील होता.

एक अर्थशास्त्री, विधिवेता आणि समाजविज्ञानी होण्याच्या नात्याने बाबासाहेबांना या गोष्टीची जाणीव होती की संविधान मात्र एक कायदेशीर दस्ताऐवज नाही तर एक सामाजिक आणि आर्थिक दस्ताऐवज आहे. ज्यामुळे कोट्यावधी लोकांची महत्त्वाकांक्षा न मागता सामील असते. लोकतंत्राच्या समर्थकाच्या रुपात बाबासाहेबांनी भारतीय गणतंत्रासाठी एक संसदीय व्यवस्थेचे संविधान बनविण्यावर जोर दिला. त्यांनी असे मत मांडले होते की, जे संविधान आम्ही बनविणार आहेत ते संपूर्ण देशवासियांच्या हितांचे रक्षार्थ असयला पाहीजे ज्याला संपूर्ण देशातील लोक स्वीकार करतील आणि जे संविधान पिढ्यान पिढया चालत राहील तसेच देशातील एकतेला एका सुत्रात बांधेल.

संविधानाचे प्रारूप बनविण्याची जबाबदारी बाबासाहेबांवर होती. भारतासारखा देश जेथे विविध धर्माचे लोक वास्तव्य करतात त्यांच्या अपेक्षा आणि अधिकाराचे रक्षण करण्याचे दायीत्व त्यांच्यावर होते. तसेच दुसऱ्या बाजुला पिढ्यान पिढ्यापासून बहिष्कृत समजल्या जाणाऱ्या आणि तिरस्काराचे जीवन जगणारे लोक होते. स्वतंत्र भारताच्या संविधानात बहिष्कृत समाजासाठी सुध्दा अशी व्यवस्था करायची होती ज्यामुळे ते समानतेचे जीवन यापन करु शकतील.

बाबासाहेबांनी निरंतर आणि अथक परिश्रम करुन संविधाच्या प्रारुपाची तौयारी केली आणि फेंब्रुवारी 1948 मध्ये संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांना हे प्रारुप सोपवून दिले. आणि संविधान निर्माण करण्याचे कार्य 4 नोव्हेंबर 1948 मध्ये पूर्ण झाले. या संविधानात 315 अनुच्छेद आणि 8 अनुसीचींचा समावेश होता. या देशातील अल्पसंख्याक आणि बहुसंख्याक दोन्ही वाईट मार्गाचा अनुसरण करत आहेत. अल्पसंख्यांकांच्या अकस्तत्वाला नाकाराने बहुसंख्याकांकाची चूक आहे. आणि अल्पसंख्याक हे नेहमी अल्पसंख्याक राहतील हे सुध्दा चुकीचे आहे. अल्पसंख्याक येथे एक विस्फोटक शक्ती रुपात आहेत. त्यांच्या भावनांचा जर स्फोट झाला तर देशाची संरचना ध्वस्त होईल. असे डॉ बाबासाहेब आंबेडकर मानत होते.

**भारतीय संविधान आणि उपेक्षित वर्ग :**

भारतीय संविधानाचे निर्माताच्या रुपात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले कार्य एवढे महान होते की, ज्यामुळे ते भारतीय जनतेच्या हृदयात त्यांच्या प्रति आदर आणि प्रेमाची भावना अनंतकाळ कायम राहील. भारतीय संविधाना समक्ष अस्पृश्यता, असमानता, रुढीवादीता, सामंतवाद, साम्राज्यवाद आणि जमीनदारी प्रथा व अंधविश्वास यांना तिरस्कृत व्हावे लागले. सर्व धर्मांच्या लोकांना भारतीय संविधानाने आत्मप्रगतीची संधी प्राप्त करुन दिली. परंतु असे असले तरी देशातील जवळजवळ एक चतृंथाश लोकसंख्या अनुसूचित जाती आणि जमातीची आहे त्यांची कायापलट या संविधानाने केली. या जाती जमतींना संविधानाद्वारे धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय मान्यता मिळाल्याने त्यांच्यात उत्साहपूर्ती निर्माण केली ज्यांचा अभाव त्यांच्यामध्ये कित्येक वर्षापासून होता. संविधानाने त्यांना आर्थिक प्रगतीचे नवीन मार्ग प्रशस्त केले. मानवतेच्या इतिहासात या अस्पृश्यांच्या प्रगतीचा नवीन अध्याय जोडण्यात आला.

- भारतीय संविधानात दलित आणि आदिवासींना अनुसूचित जाती व अनुसूचीत जमाती संबोधण्याचे प्रवधान करण्यात आले.
- तसेच संविधानात त्यांच्या सुरक्षा आणि आर्थिक समृध्दीसाठी नोकरींचे प्रवधान करण्यात आले.
- अतिरीक्त सर्वच अल्पसंख्यक समजांना व अविकसित समाजाला ही स्वतंत्रता देण्यात आली की, ते आपली भाषा आणि संस्कृती च्या सुरक्षेसाठी शिक्षण संस्था कायम करु शकतील.

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

- भारतीय संविधान शासनाची राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दिशा निर्देशनाचे स्त्रोत आहे. हे संविधान समाजासाठी एक आर्थिक व्यस्थेचे सुध्दा निर्धारण करते.
- संविधानात हे सुध्दा निर्धारित करते की, उत्पादन साधनांचे मालकी तथा त्यांचे प्रबंधनाचे काय स्वरुप आहे तसेच समाज आपल्या उत्पन्नाचे वितरण कशाप्रकारे करेल.

भारतीय राज्यघटनेने उपेक्षीत व दुर्बळ घटकांना विशेष संरक्षण आणि अधिकार दिले आहेत. या घटकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, आणि इतर मागासलेले वर्ग यांचा समावेश आहे. राज्यघटनेने या घटकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायासाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत.

भारतीय संविधानात अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) यांना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांच्याविरुद्ध होणारा भेदभाव रोखण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत.

**अनुसूचित जाती (SC):**

संविधानाच्या कलम 341 अंतर्गत, राष्ट्रपतींना अनुसूचित जातींची यादी जारी करण्याचा अधिकार आहे. यामध्ये राज्याच्या संबंधात अनुसूचित जाती म्हणून मानल्या जाणाऱ्या जाती, जमाती किंवा जाती किंवा जमातींचे भाग समाविष्ट आहेत. अनुच्छेद 341 मध्ये परिभाषित केलेल्या अनुसूचित जातींना शिक्षण, रोजगार आणि इतर क्षेत्रात आरक्षण आणि इतर विशेष संरक्षण दिले जाते.

**अनुसूचित जमाती (ST):**

संविधानाच्या कलम 342 अंतर्गत, राष्ट्रपतींना अनुसूचित जमातींची यादी जारी करण्याचा अधिकार आहे. यामध्ये राज्याच्या संबंधात अनुसूचित जमाती म्हणून गणल्या जाणाऱ्या जमाती किंवा आदिवासी समुदायांचा समावेश आहे. अनुच्छेद 342 मध्ये परिभाषित केलेल्या अनुसूचित जमातींना शिक्षण, रोजगार आणि इतर क्षेत्रात आरक्षण आणि इतर विशेष संरक्षण दिले जाते.

**इतर महत्त्वाच्या तरतुदी:**

- कलम 15 जातीच्या आधारावर भेदभाव करण्यास मनाई करते.
- कलम 17 अस्पृश्यता रद्द करते.
- अनुच्छेद 46 राज्याला अनुसूचित जाती आणि जमातींच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितांना प्रोत्साहन देण्याचे आणि सामाजिक अन्यायापासून त्यांचे संरक्षण करण्याचे निर्देश देते.
- अनुच्छेद 275(1) केंद्र सरकारला अनुसूचित जमातींच्या कल्याणासाठी राज्यांना आर्थिक मदत देण्याचे निर्देश देते.
- अनुच्छेद 335 मध्ये अनुसूचित जाती आणि जमातीच्या सदस्यांच्या सेवा आणि पदांवरील दावे विचारात घेण्याची तरतूद आहे.
- अनुसूचित जाती आणि जमातींसाठी विशेष अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची तरतूद कलम 338 मध्ये आहे.

**अत्याचार प्रतिबंधक कायदा:**

- अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ जाती-आधारित गुन्ह्यांपासून संरक्षण प्रदान करतो.

Patil Social Work College, College Code 225, Akola

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
www.ycjournal.net
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40

- संविधान (अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती) आदेश (सुधारणा) विधेयक:
- या विधेयकाचा उद्देश अनुसूचित जाती आणि जमातींच्या यादीत सुधारणा करणे आहे.

**भारतीय संविधानातील उपेक्षीत घटकांसाठी उपाययोजना:**

**मूलभूत अधिकार:**

राज्यघटनेने सर्व नागरिकांना समानता, अन्याय आणि भेदभावापासून संरक्षण, तसेच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायासाठी अधिकार दिले आहेत.

**विशेष तरतुदी:**

राज्यघटनेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासलेल्या वर्गांसाठी विशेष तरतुदी आहेत, जसे की आरक्षणाची तरतूद, विशेष योजना आणि कार्यक्रम, आणि अन्याय निवारणासाठी विशेष न्यायालये.

**राजकीय प्रतिनिधित्व:**

राज्यघटनेने या घटकांना विधानसभेत आणि इतर राजकीय संस्थांमध्ये प्रतिनिधित्व देण्याची तरतूद केली आहे, ज्यामुळे त्यांना राजकीय निर्णय प्रक्रियेत सक्रिय भूमिका घेता येते.

**सामाजिक न्याय:**

राज्यघटनेने सामाजिक न्यायासाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत, जसे की अस्पृश्यता निवारण, बाल कामगार प्रतिबंध, आणि महिलांवरील अत्याचारांविरुद्ध कायदा.

**अर्थव्यवस्था:**

राज्यघटनेने आर्थिक न्यायासाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत, जसे की गरीब आणि दुर्बळ लोकांसाठी आर्थिक सहाय्य योजना, रोजगार निर्मिती आणि कौशल्य विकास कार्यक्रम.

**शिक्षण:**

राज्यघटनेने शिक्षणासाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत, जसे की प्रत्येक मुला-मुलीला शाळेत जाण्याचा अधिकार, मोफत शिक्षण आणि शिष्यवृत्ती.

**सामाजिक न्याय**

सामाजिक न्याय हे उद्दिष्ट संविधानाच्या प्रतिज्ञापत्रकात तसेच मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्त्वे ह्यात समाविष्ट आहे. नवीन समाज हा न्यायावर आधारलेला असावा, ही जाणीव स्वातंत्र्य चळवळीपासून भारतीय जनतेत दृढमूल झाली. मालमत्तेचे वाटप न्याय्य पद्धतीने व्हावे, उत्पादनाची साधने फक्त थोड्या लोकांच्या हाती राहू नयेत, सर्वांना समान वेतन मिळावे, स्त्रिया व मुले ह्यांचे हितसंबंध सुरक्षित रहावेत व समाजातल्या दुबळ्या गटांना वर येण्याची संधी मिळावी, ही ती तत्वे होत. सामाजिक व आर्षिक विषमता कमी व्हावी, ही त्यामागची प्रमुख प्रेरणा होय.

**सारांश**

स्वतंत्र भारताचे संविधान हे दूरदृष्टीच्या अभ्यासू, व्यासंगी अशा लोकप्रतिनिधींनी घटनासमितीत सखोल आणि सांगोपांग चर्चा करून तयार केले असून ते स्वतंत्र भारताच्या ध्येयवादाचे निदर्शक आहे. भारताच्या इतिहासात त्यास एक अपूर्व व अनन्यसाधारण घटना म्हणून महत्व आहे. अर्थात भारतीय संविधानाच्या निर्मितीला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे आणि त्यातील तरतुदी या नव्या भारताच्या जडणघडणीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या आहेत. भारतीय

RESEARCH NEBULA
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

संविधान उपेक्षीत वर्गांना समानता, न्याय आणि समान संधी मिळवून देण्यासाठी एक महत्त्वाचे दस्ताऐवज आहे. राज्य आणि केंद्र सरकारला या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करून उपेक्षीत वर्गाच्या विकासासाठी मदत करायला पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. कुबेर डब्लू एन., (1981) आधुनिक भारत के निर्माता भीमराव आंबेडकर, नवी दिल्ली.
2. जाटव डी.आर., डॉ आंबेडकर एक प्रखर विद्रोही, ए.वी.सी. पकब्लशर्स, नवी दिल्ली.
3. भंडारी चंद्रशेखर, (1999) भारत मे बौध्द धर्म का पुनर्जागरण एवं समस्याये, दलित टूडे प्रकाशन, मुंबई
4. भटनागर राजेन्द्र कुमार (1994), डॉ. आंबेडकर व्यकक्तमत्त्व और कृतित्त्व, चिन्मय प्रकाशन, जयपुर.

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
www.ycjournal.net

ISSN 2277-8071
DOI PREFIX 10.22183
J-Gate INDEXED
Indexed in the ICI Journals Master List
INDEX COPERNICUS INTERNATIONAL

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

Impact Factor 8.137

*One Day National Interdisciplinary Conference on*

# The 75th Anniversary of the Indian Constitution:

## Achievements, Challenges, Impact, Relevance and Significance

On 30th August, 2025

Organized by

*Bhartiya Seva Sadan's*

## Smt. Radhadevi Goenka College for Women

*Akola, Maharashtra*

**SPECIAL ISSUE**

Special Issue Published on 30th August, 2025

www.ucjournal.net

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in
Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
www.ycjournal.net
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40



| | | | |
|---|---|---|---|
| 25. | श्रीमती प्रा.सोनाली जिजाबराव पवार,<br>प्रा.डॉ.विनोद खैरे | संविधान आणि आरक्षण - स्वरूप, महत्त्व आणि भविष्य | 176 |
| 26. | आशिष सुधाकरराव निमकर | लोकशाही शासन व्यवस्थेत पदवीस्तरीय विद्यार्थ्यांच्या राजकीय जाणिवांची आवश्यकता व उपयोगीता | 182 |
| 27. | प्रा.डॉ.आर.जी.सुरळकर | भारतीय लोकशाहीचे भवितव्य आणि आव्हाने | 190 |
| 28. | डॉ. नामानंद गौतम साठे | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | 198 |
| 29. | कैलाश मांटे | सामाजिक न्यायाच्या प्राप्तीत भारतीय संविधानाचे योगदान | 202 |
| 30. | डॉ. विकास कृष्णराव जुनगरी | राज्यघटनेच्या परिघातून व्यक्तीविकास | 206 |
| 31. | डॉ. गजानन जी. हिवराळे | संविधानिक पदांच्या आरक्षणाची स्थिती | 212 |
| 32. | अमोल यावलीकर | "भारतीय संविधानातील महिलांचे अधिकार व त्याचा महिलांच्या आरोग्यावर पडलेला प्रभाव"<br>(विशेष संदर्भ पंतप्रधान उज्वला गॅस योजना ) | 217 |
| 33. | प्रा. डॉ. ऋजुता रुचिर गोडबोले (पांडे) | स्वातंत्र्य चळवळीत संस्कृत साहित्याची भूमिका | 224 |
| 34. | Dr. Vibha C. Ghodkhande | महिला सक्षमीकरण आणि संविधान | 232 |
| 35. | प्रा. डॉ. शाम दुतोंडे | भारतीय संविधानाच्या उपलब्धी आणि आव्हाने: एक विश्लेषण | 238 |
| 36. | रुपेश भगवान कंकाळ | भारतीय संविधान आणि टाटा उद्योगसमूह : आद्योगिक राष्ट्रनिर्माणातील योगदान व राष्ट्रीय ओळखीची जडणघडण (१८६८ ते २०१२) | 244 |
| 37. | प्रा. डॉ. मिनाक्षी कांबळे | स्त्री पुरुष समानता व कौटुंबिक व्यवस्थापनात महिलांचे सशक्तिकरण | 250 |
| 38. | डॉ. मनोज उत्तमराव पाटील | भारतीय संविधान निर्मितीत तत्त्वाचे अधिष्ठान | 257 |
| 39. | डॉ. संतोष गोपाळकृष्ण कुळकर्णी | भारतीय लोकशाहीचा आढावा आणि भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने | 264 |
| 40. | डॉ.बळीराम परशराम अवचार | "राष्ट्रीय एकात्मतेमध्ये भारतीय संविधानाचे योगदान" | 268 |
| 41. | निलेश रामदास गावंडे | भारतीय समाजात समानतेचा शोध | 273 |
| 42. | कुमारी शुभांगी सुरेशराव ढगे | यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी पारधी जमातीच्या महिलांसाठी शासनाच्या आहार व आरोग्याबद्दलच्या योजना व संविधानातील तरतुदी बद्दल चिकित्सक अध्ययन | 281 |
| 43. | डॉ. संदीप नामदेव शिंदे | भारतीय समाजातील इतर मागासवर्गीय वर्गावर भारतीय राज्यघटनेचा परिणाम | 285 |
| 44. | प्रा. डॉ. माधव आनेराव | भारतीय राज्यघटना आणि मुलभूत हक्क : एक अवलोकन | 289 |
| 45. | सुचिता चंदुलाल बुजुर्गे | घटनात्मक मूल्ये आणि नागरिकशिक्षण: आधुनिक शिक्षणातील भूमिका | 295 |

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

One Day National Interdisciplinary Conference on
THE 75th ANNIVERSARY OF THE INDIAN CONSTITUTION: ACHIEVEMENTS, CHALLENGES, IMPACT, RELEVANCE AND SIGNIFICANCE
On 30th August, 2025

Bhartiya Seva Sadan's
SMT. RADHADEVI GOENKA COLLEGE FOR WOMEN,
Akola, Maharashtra.

# "राष्ट्रीय एकात्मतेमध्ये भारतीय संविधानाचे योगदान"

**डॉ.बळीराम परशराम अवचार ,**
सहयोगी प्राध्यापक,
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला.
मो. ९३०९३११९५५ , ९४०५६१७५७६
Email: balirampawachar@gmail.com

## १. प्रस्तावना :

भारतीय संविधान हे केवळ देशाच्या प्रशासनाचे नियमन करणारे एक दस्तऐवज नसून, ते राष्ट्रीय एकात्मतेचे एक शक्तिशाली प्रतीक आणि पायाभूत स्तंभ आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, विविध धर्म, भाषा, संस्कृती, जाती आणि प्रांतांमध्ये विभागलेल्या देशाला एका सूत्रांत बांधणे हे एक मोठे आव्हान होते. भारतीय संविधान निर्मात्यांनी हे आव्हान स्वीकारले आणि एक असा दस्तऐवज तयार केला, ज्याने 'विविधतेत एकता' हे तत्त्व प्रत्यक्षात आणले भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असून त्याची ओळख विविधतेत एकतेसाठी केली जाते. येथे २२ अधिकृत भाषा, शेकडो बोलीभाषा, अनेक धर्म, जाती, पंथ, प्रांत आणि विविध सांस्कृतिक परंपरा आहेत. अशा विविधतेत एकात्मता टिकवून ठेवणे ही कोणत्याही राष्ट्रासाठी मोठी कसोटी असते.

भारतीय संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून, देशाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाचा पाया आहे. त्यात राष्ट्रीय एकात्मता टिकवण्यासाठी आवश्यक असलेली सर्व मूलभूत मूल्ये आणि रचना समाविष्ट आहे. राष्ट्रीय एकात्मता ही केवळ भौगोलिक अखंडतेपुरती मर्यादित नसून मानसिक, सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक, आर्थिक आणि राजकीय सलोखाही तिचा भाग आहे. भारतीय संविधानाने या सर्व पैलूंना एकत्र बांधून ठेवण्याचे कार्य प्रभावीपणे केले आहे.

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

भारतीय संविधान हे केवळ एक राजकीय दस्तऐवज नसून, ते भारतीय समाजातील विविधता एकत्र आणणारे आणि 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेला मूर्त रूप देणारे एक सामाजिक आणि भावनिक साधन आहे. मूलभूत हक्क, धर्मनिरपेक्षता, एकल नागरिकत्व, मजबूत केंद्र व्यवस्था आणि भाषिक धोरणांसारख्या तरतुदींद्वारे संविधानाने राष्ट्रीय एकात्मतेचा पाया रचला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात देशासमोर अनेक आव्हाने उभी राहिली, परंतु संविधानाने दिलेल्या मजबूत चौकटीमुळे भारताने आपली एकता आणि अखंडता टिकवून ठेवली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटल्याप्रमाणे, "संविधान हे केवळ एक पुस्तक नाही, ते एक जीवनशैली आहे." या जीवनशैलीनेच भारताला एकसंध आणि बलवान राष्ट्र म्हणून उभे केले आहे. त्यामुळे, राष्ट्रीय एकात्मतेमध्ये भारतीय संविधानाचे योगदान अतुलनीय आहे.

**२. राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना व महत्त्व :**

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे राष्ट्रातील सर्व घटकांनी एकमेकांबद्दल सन्मान, समजूतदारपणा, परस्पर विश्वास आणि सहकार्याची भावना बाळगून कार्य करणे.

राष्ट्रीय एकात्मतेचे मुख्य घटक:

1. भौगोलिक एकात्मता - अखंड राष्ट्रसीमा व त्याचे संरक्षण.
2. सामाजिक एकात्मता - जाती, धर्म, भाषा, लिंग यांच्या पलीकडे जाऊन समानता.
3. सांस्कृतिक एकात्मता - विविधतेचा आदर व सांस्कृतिक वारशाचे संवर्धन.
4. आर्थिक एकात्मता - सर्वांसाठी समान आर्थिक संधी.
5. राजकीय एकात्मता - लोकशाही पद्धतीत सर्व घटकांचा सहभाग.

**3. संविधान निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

भारतीय संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारले आणि २६ जानेवारी १९५० पासून अंमलात आले.

**संविधान सभेची प्रमुख उद्दिष्टे:**

- स्वातंत्र्यानंतर देशाची अखंडता राखणे.
- विविधता जपत लोकशाही मूल्यांचा प्रसार करणे.
- सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय साधणे.

त्या वेळी देशाला विभाजनामुळे झालेली धार्मिक हिंसा, भाषिक मतभेद, प्रांतिक स्वार्थ, आर्थिक विषमता यांसारख्या अनेक समस्या होत्या. अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेले संविधान हे राष्ट्रीय एकात्मतेचे सर्वात प्रभावी साधन ठरले.

**4. संविधानातील प्रमुख तरतुदी आणि त्यांचे राष्ट्रीय एकात्मतेतील योगदान:**

भारतीय संविधानाने अनेक महत्वपूर्ण तरतुदींद्वारे राष्ट्रीय एकात्मतेचा पाया रचला आहे. यातील काही प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे आहेत:

**1. उद्देशिका (Preamble):**

संविधानाची उद्देशिका हे राष्ट्रीय एकात्मतेचे सर्वात महत्वाचे द्योतक आहे. "आम्ही, भारताचे लोक..." या शब्दांनी सुरू होणारी उद्देशिका, भारताला एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र घोषित

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in
Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

करते. यात न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर भर दिला आहे. 'व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता' सुनिश्चित करण्याचे वचन देऊन, संविधानाने देशाच्या सर्व नागरिकांना एका समान ओळखीत बांधले आहे.

**2. मूलभूत हक्क (Fundamental Rights):**

संविधानाचा भाग ३, नागरिकांना मूलभूत हक्कांची हमी देतो. यामध्ये समानता, स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य आणि सांस्कृतिक व शैक्षणिक हक्कांचा समावेश आहे.

**3. समानतेचा हक्क (कलम १४-१८):**

कायद्यासमोर सर्व नागरिक समान आहेत, कोणत्याही नागरिकावर धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान यांवरून भेदभाव केला जाणार नाही, ही तरतूद सामाजिक समानता प्रस्थापित करून जातीय आणि प्रांतीय भेद कमी करते.

**4. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (कलम २५-२८):**

प्रत्येक नागरिकाला आपल्या आवडीच्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य आहे. या तरतुदीमुळे भारत एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र बनले आहे, जे विविध धर्मांच्या सहअस्तित्वाला प्रोत्साहन देते. यामुळे धार्मिक सलोखा निर्माण होण्यास मदत होते.

**5. सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क (कलम २९-३०):**

अल्पसंख्यांकांना त्यांच्या भाषा आणि संस्कृतीचे संरक्षण करण्याचा हक्क देऊन, संविधानाने त्यांच्यामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण केली आहे, ज्यामुळे ते राष्ट्रीय प्रवाहात सामील राहतात.

**6. नागरिकत्व (Citizenship):**

भारतीय संविधानाने 'एकल नागरिकत्वा'ची तरतूद केली आहे. अमेरिकेसारख्या देशांमध्ये राज्यांचे वेगळे नागरिकत्व असते, पण भारतात प्रत्येक नागरिक 'भारतीय' आहे. ही तरतूद प्रांतीय निष्ठांपेक्षा राष्ट्रीय निष्ठेला महत्त्व देते, ज्यामुळे देशाच्या एकतेची भावना दृढ होते.

**7. मजबूत केंद्र सरकार आणि संघराज्य व्यवस्था:**

भारतीय संविधानाने केंद्राला अधिक अधिकार दिले आहेत, ज्यामुळे देशाची एकता आणि अखंडता टिकवून ठेवता येते. उदा. राज्यांची सीमा बदलणे, आणीबाणीच्या परिस्थितीत केंद्राला अधिक अधिकार मिळणे, अखिल भारतीय सेवा (All India Services) इत्यादी तरतुदी केंद्र-राज्य संबंधांमध्ये समन्वय साधतात. एकात्म राज्यव्यवस्थेची ही वैशिष्ट्ये देशाच्या राजकीय एकात्मतेसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

**8. राज्याची मार्गदर्शक तत्त्वे (Directive Principles of State Policy):**

संविधानाचा भाग ४, राज्यांसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करतो. ही तत्त्वे आर्थिक आणि सामाजिक समानता प्रस्थापित करण्यावर भर देतात. दारिद्र्य निर्मूलन, सर्वांना समान संधी देणे, कल्याणकारी राज्याची स्थापना करणे यांसारख्या उद्दिष्टांमुळे नागरिकांमध्ये आर्थिक विषमता कमी होते आणि ते राष्ट्रीय विकासात समान भागीदार बनतात.

**9. अखिल भारतीय सेवा (All India Services):**

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in
Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

भारतीय प्रशासन सेवा (IAS) आणि भारतीय पोलीस सेवा (IPS) यांसारख्या अखिल भारतीय सेवांमधील अधिकारी केंद्र आणि राज्यांमध्ये काम करतात. हे अधिकारी विविध राज्यांमधून येतात आणि त्यांची नियुक्ती देशातील कोणत्याही राज्यात होऊ शकते. यामुळे प्रशासनात एकसमानता येते आणि प्रांतीय हितसंबंधांपेक्षा राष्ट्रीय हितसंबंधांना प्राधान्य दिले जाते.

**5. भाषा आणि एकात्मता :**

भारतातील भाषिक विविधता राष्ट्रीय एकात्मतेसमोरील एक मोठे आव्हान होते. संविधानाने यावर एक संतुलित तोडगा काढला.

1. **हिंदीला अधिकृत भाषा म्हणून मान्यता:**

   संविधानाने हिंदीला देवनागरी लिपीमध्ये केंद्र सरकारची अधिकृत भाषा म्हणून घोषित केले (कलम ३४३).

2. **प्रादेशिक भाषांचे संरक्षण:**

   त्याचबरोबर, संविधानाच्या आठव्या परिशिष्टात २२ प्रादेशिक भाषांना मान्यता देऊन त्यांच्या विकासाची ग्वाही दिली आहे. यामुळे प्रादेशिक भाषांना महत्त्व मिळाले आणि भाषिक अस्मितेमुळे निर्माण होणारे संघर्ष टाळता आले. त्रिभाषा सूत्राच्या धोरणानेही राष्ट्रीय एकात्मता साधण्यास मदत केली.

भारतीय संविधान या सर्व घटकांचे संवर्धन व संरक्षण करते, त्यामुळे त्याचे योगदान अत्यंत महत्वाचे ठरते.

**6. संघराज्य पद्धतीतील एकात्मता :**

भारतीय संविधानाने संघराज्य रचना स्वीकारली आहे, पण ती 'अखंडतेस प्राधान्य देणारी' आहे.

- एकच नागरिकत्व - संपूर्ण देशासाठी समान भारतीय नागरिकत्व.
- संयुक्त न्यायपालिका - सर्वोच्च न्यायालयापासून जिल्हा न्यायालयापर्यंत एकसंध न्यायव्यवस्था.
- संयुक्त निवडणूक आयोग - निवडणुका पारदर्शक आणि देशव्यापी.
- आपत्कालीन तरतुदी (कलम ३५२-३६०) - राष्ट्रीय एकात्मतेस धोका निर्माण झाल्यास केंद्र सरकारला विशेष अधिकार.

**7. धर्मनिरपेक्षता :**

संविधानाने भारताला धर्मनिरपेक्ष राष्ट्र घोषित केले आहे. ते खालीलप्रमाणे.

- कलम २५-२८ - सर्व धर्मांना समान स्वातंत्र्य.
- राज्य कोणत्याही धर्माचा प्रचार किंवा भेदभाव करत नाही.
- धार्मिक सलोखा व सहिष्णुता टिकवून एकात्मतेस बळकटी.

**8. दिशा-निर्देशक तत्त्वे (Directive Principles) :**

संविधानाच्या चौथ्या भागातील ही तत्वे सामाजिक व आर्थिक एकात्मतेस हातभार लावतात.

- सर्वांसाठी शिक्षण
- समान कामासाठी समान वेतन
- दुर्बल घटकांचे संरक्षण
- प्रादेशिक विषमता कमी करणे

**9. न्यायपालिकेची भूमिका :**

Smt. P.D. Patil Social Work College Code 225



Scanned with OKEN Scanner

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL ICV 2023: 73.40
www.ycjournal.net

न्यायपालिका ही फक्त कायद्याची व्याख्या करणारी संस्था नसून एकात्म राष्ट्रीय भावना टिकवून ठेवणारी आधारशिला आहे. तिच्या स्वायत्ततामुळे आणि संविधाननिष्ठ भूमिकेमुळे भारताची अखंडता, समता व लोकशाही कायम राहते. न्यायपालिका राष्ट्रीय एकात्मतेचा अत्यावश्यक घटक आहे. भारतीय न्यायपालिका राष्ट्रीय एकात्मतेची रक्षक आहे.

**10. आव्हाने व संविधानाची प्रतिसाद क्षमता:**

भारतातील विविधता ही एकात्मतेची ताकद असली तरी ती मतभेदांचे कारण होऊ शकते. म्हणूनच एकात्मता टिकवून ठेवण्यासाठी काही मुख्य आव्हाने आहेत ती खालीलप्रमाणे.

- सांप्रदायिक दंगे
- भाषिक आंदोलन
- प्रादेशिक स्वायत्ततेच्या मागण्या
- सामाजिक विषमता

भारतीय संविधानाने या आव्हानांना लवचिकतेने तोंड दिले आहे, उदा. विशेष राज्य तरतुदी (कलम ३७१), आरक्षण, स्वायत्त परिषद.

**11. वर्तमान आणि भविष्याचा दृष्टिकोन :**

आज जागतिकीकरण, तंत्रज्ञान, सोशल मीडियामुळे माहिती वेगाने पसरते. त्यामुळे ध्रुवीकरणाचा धोका वाढला आहे, पण संविधानाची मूल्ये - समानता, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य - ही या आव्हानांना उत्तर देऊ शकतात.

भविष्यात संविधानाची लवचिकता, न्यायपालिकेची स्वायत्तता आणि लोकांचा सहभाग यांमुळे राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट होईल.

**12. निष्कर्ष :**

भारतीय संविधान हे राष्ट्रीय एकात्मतेचे सर्वात प्रभावी साधन आहे. त्याने विविधतेला स्वीकारले, समानतेचा पाया घातला, धार्मिक आणि भाषिक स्वातंत्र्य दिले आणि आर्थिक-सामाजिक न्याय साधण्याचा मार्ग दाखवला. आज व उद्या, संविधानाच्या मूल्यांचा सन्मान राखणे आणि त्यांचे पालन करणे हेच राष्ट्रीय एकात्मता टिकवण्याचे प्रमुख साधन आहे.

**संदर्भसूची :**

1. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. संविधान निर्मितीतील भाषणे.
2. बक्षी, पी. एम. भारतीय संविधान. युनिव्हर्सल लॉ पब्लिशिंग.
3. बिपिनचंद्र. India Since Independence. पेंग्विन बुक्स.
4. सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यांचा संग्रह - indiancourts.nic.in
5. भारतीय संविधान - भारत सरकारचे अधिकृत संकेतस्थळ legislative.gov.in

Sant P.D. Patil Social Work College, College Code 225, AKOLA

Dr. [illegible]

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
www.ycjournal.net

ISSN 2277-8071
DOI PREFIX 10.22183
J-Gate INDEXED
Indexed in the ICI Journals Master List
INDEX COPERNICUS INTERNATIONAL

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

Impact Factor 8.137

**One Day National Interdisciplinary Conference on**

# The 75th Anniversary of the Indian Constitution:

## Achievements, Challenges, Impact, Relevance and Significance

**On 30th August, 2025**

**Organized by**

***Bhartiya Seva Sadan's***

# Smt. Radhadevi Goenka College for Women

***Akola, Maharashtra***

**SPECIAL ISSUE**

Special Issue Published on 30th August, 2025

www.ucjournal.net



Smt. P.D. Patil Social Work College, College Code 225, AKOLA
Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 46. | डॉ. विष्णू नामदेव लांडे | गोपाळ गणेश आगरकर यांच्या निबंधातील स्वातंत्र्य व समतावादी विचार | 306 |
| 47. | कु. जया पुंडलिक थोरात,<br>प्रा. डॉ. विनोद खैरे | भारतीय संविधानातील महिलांचे अधिकार : श्रीमती राधादेवी गोयनका यांचे कार्य व योगदान | 312 |
| 48. | डॉ. हनुमंत अंकुशराव भोसले<br>डॉ. संजय तुकाराम वराडे | भारतातील आर्थिक प्रशासन आणि वित्तीय धोरण: घटनात्मक दृष्टीकोन | 319 |
| 49. | डॉ. प्रदिप विठ्ठलराव ताकतोडे | भारतीय राज्यघटना, आर्थिक धोरण आणि आर्थिक शासन : आव्हाने आणि संधी | 328 |
| 50. | संदीप वानखडे<br>प्रा.डॉ.विनोद खैरे | भारतीय संविधानातील कृषी उत्पन्न बाजार समितीविषयी तरतुदी | 334 |
| 51. | प्रा. डॉ. ज्ञानेश्वर एस. नामुर्ते<br>श्री शैलेश विजयराव मांदळे | अनुसूचित जाती आणि संविधानातील घटनात्मक तरतूदी | 337 |
| 52. | प्रा. डॉ.सिद्धार्थ शिवाजी वाठोरे | प्राचीन भारतातील प्रजासत्ताक (गणराज्य) | 343 |
| 53. | डॉ.केशव विठ्ठल कोकाटे | संत तुकारामांच्या साहित्यातील समतावादी विचार | 348 |
| 54. | प्रा. डॉ. संतोष एस. मिसाळ | भारतीय संविधान आणि आरक्षण एक विश्लेषण | 352 |
| 55. | ऋतिक सुनील लंघे | लोकशाही संस्थांचे घटनात्मक संरक्षण: भारतीय संविधानाचा महत्त्वपूर्ण पैलू | 356 |
| 56. | प्रा.डॉ.सुरेश माळशिखरे | प्राचीन भारतातील न्याय प्रशासन - एक ऐतिहासिक विश्लेषण | 361 |
| 57. | कु. पुनम प्रकाश तिवारी<br>डॉ. उद्धव कांबळे | मानवतेचे पुजारी संत गाडगेबाबा यांनी दिलेला मंत्र स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय. | 365 |
| 58. | डॉ. निलम मधुसूदन छंगाणी | भारतीय संविधानातील अर्थनिती एक अभ्यास | 369 |
| 59. | डॉ. अंकुश शरद बिजाका | संविधान सभेत दुर्गाबाई देशमुख यांचे योगदान | 374 |
| 60. | प्रा. डॉ. विनय वामनराव तायडे | भारतीय लोकशाहीचा इतिहास | 382 |
| 61. | डॉ. सुवर्णा गाडगे | महात्मा फुले यांच्या वैचारिक साहित्यातील संविधानिक मूल्य | 389 |
| 62. | डॉ. प्रमोद चव्हाण<br>डॉ. दयानंद उत्तमराव राऊत | भारतातील मागासवर्गीयाच्या सामाजिक जीवनावर संविधानाचा प्रभाव | 397 |
| 63. | प्रा. डॉ. बंडु उत्तम जामनिक | भारतीय संविधानात महिलांचे योगदान - एक दृष्टिक्षेप | 401 |
| 64. | प्रा. डॉ. ज्ञानेश्वर एस. नामुर्ते<br>रविंद्र रामदास धरमठोक | अनुसूचित जमाती आणि संविधानातील घटनात्मक तरतूदी | 409 |
| 65. | प्रा. डॉ. केशव सिताराम गोरे | मराठीतील संत ज्ञानेश्वरांच्या साहित्यातील समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय | 414 |
| 66. | प्रा.डॉ. भाऊराव रामेश्वर तनपुरे | भारतीय लोकशाहीचा इतिहास | 420 |
| 67. | डॉ. एम. पी. गोमासे | भारतीय लोकशाहीचा इतिहास | 425 |
| 68. | डॉ. स्मिता भू. भोंडे | स्थानिक स्वराज्य संस्थांची वाटचाल व ग्राम विकास - एक अभ्यास | 435 |




Smt. P.D. Patil Social Work College Code 225

Scanned with OKEN Scanner

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

One Day National Interdisciplinary Conference on
THE 75th ANNIVERSARY OF THE INDIAN CONSTITUTION: ACHIEVEMENTS, CHALLENGES, IMPACT, RELEVANCE AND SIGNIFICANCE
On 30th August, 2025

*Bhartiya Seva Sadan's*
SMT. RADHADEVI GOENKA COLLEGE FOR WOMEN,
*Akola, Maharashtra.*

# मराठीतील संत ज्ञानेश्वरांच्या साहित्यातील समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय

**प्रा. डॉ. केशव सिताराम गोरे (मराठी विभाग)**
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी अकोला
मो. नं. ९६३७४४२९३७
मेल keshavgore101@gmail.com

आपला महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या भूमीत संत ज्ञानेश्वरांपासून तर संत गाडगेबाबा पर्यंत अनेक महान संत होऊन गेलेत. महाराष्ट्रीयन संतांची एक विशिष्ट परंपरा आहे. सर्व संतांनी ग्रंथातून, अभंगातून सामाजिक समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय याची शिकवण दिली. संत परंपरेत स्त्री संतांना सुद्धा मानाचे स्थान होते. सकाळांशी येथे आहे अधिकार । कलियुगी उद्धार हरीच्या नामे ॥ असे त्यांचे सांगणे होते. या संतांचा एक पंथ होता. त्याला वारकरी पंथ या नावाने ओळखले जाते. वारकरी पंथाचे उपास्य दैवत श्री विठ्ठल आहे आणि आषाढी वारीची परंपरा आहे. वारकरी पंथात सर्व जाती धर्माच्या स्त्री-पुरुषांना येण्यास कुठलाही अडकाव नाही. संतांनी सर्वात सोपी नाम भक्ती सांगितली आहे. नामसंकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतरीची ॥ अशी त्यांची भक्ती संकल्पना होती.

संत कवी म्हणून ओळखले जाणारे बहुतेक जण वारकरी पंथातच समाविष्ट होतात. संतत्व आणि कवित्व वेगवेगळे करणे कठीण आहे. कारण सर्व संतांनी आपली मनोगते व्यक्त करताना काव्यरचना केल्या. ज्याला आज आपण अभंग रचना म्हणतो. प्रत्येक अभंगातून भाव प्रकट होतो. म्हणून हे भाव काव्य सुद्धा ठरते. लोकरंजन आणि समाज परिवर्तन ही सुद्धा त्या रचने मागील प्रेरणास्थाने आहेत. आज शेकडो वर्षे झाली तरी जनमानसावरील अभंग रचनेचा प्रभाव अजूनही जसाच्या तसाच आहे, कमी झाला नाही. पुराण, पारायण, कीर्तन, प्रवचन या माध्यमातून त्यांनी लोकांपर्यंत पोहोचून लोक जागृतीचे आपले ध्येय साध्य केले यात शंका नाही.



Smt. P.D. Patil Social Work College, College Code 225, Akola
Scanned with OKEN Scanner

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in
Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023 74.40
www.ycjournal.net

ओवी, पदे, भूपाळी, पाळणे, गवळण, विराणी, श्लोक, स्तोत्र असे अनेक अविष्कार त्यांनी वापरले. गोंधळ, रुपक, जागरण, ललित, आरत्या, भारुड यासारख्या काव्यात्म व संगीतमय प्रकारांचा उपयोग त्यांनी अध्यात्माच्या प्रसारासाठी केला आहे. संतांचे काव्य परमेश्वरासंबंधीच्या भावभावनांनी संपन्न आहे. त्यामुळे त्यांचे काव्य रसाळ झाले आहे. त्याचप्रमाणे परमेश्वराशी संवाद साधत असताना त्यांनी लोकसंवादही साधला आहे, हे विसरता येत नाही.

साहित्य ही एक कला आहे. साहित्याची निर्मिती मानवी जीवनावरच आधारित असते. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. साहित्यातून समाजजीवन प्रतिबिंबित होत असते. साहित्याला संवेदनाचेही एक अंग असते. साहित्यातील अनुभवाचे एक वेगळे विश्व असते. साहित्यकृतीला भावनात्मकता आणि वैचारिकता ह्या दोन बाजू असतात. संतांच्या साहित्याला सुद्धा ह्या दोन बाजू आहेत. म्हणून संत साहित्य समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय सर्व पातळ्यावर यशस्वी ठरले आहे.

संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीचा विचार करताना हा ग्रंथ उच्च ध्येयाच्या पूर्ततेसाठी लिहिला गेला आहे. संत ज्ञानेश्वर एका अभंगात आपल्या ध्येयवादाचे वर्णन करतात - अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोका ॥ हीच तळमळ ज्ञानेश्वरी लेखनातही दिसते.

*मराठी संत साहित्यातील विचार* - वाङ्मयीन संस्कृतीच्या कोणत्याही अभ्यासकाला, संशोधकाला वारकरी चळवळीत विकसित झालेल्या असाधारण अशा अविष्कार मंत्राकडे दुर्लक्षित करून चालणार नाही. मनाच्या सर्जनशीलतेचा अर्थपूर्ण उद्रेक म्हणजे भक्तिमार्गाची चळवळ होय. या चळवळीने समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्यायाची शिकवण दिली. स्वच्छ कपडे, दररोज आंघोळ, कपाळी टिळा आणि गळ्यात तुळशी माळ यासारखा पेहराव [illegible] संतांचा होता. ही शैली वारकऱ्यांच्या गरीब अर्थव्यवस्थेला अधिक सोयीची होती. पैसा-श्रम खर्च करून महागडी यात्रा केल्यापेक्षा पंढरपूरची साधी यात्रा आवश्यक मानली गेली. या यात्रेमुळे समाजातील, पंथातील विखुरलेली भक्त मंडळी दरवर्षी समतेच्या भगव्या ध्वजाखाली जवळच्या संपर्कात येतात. संतांनी अंगीकारलेले मौखिकतेचे तत्व त्यांच्या पंथाला अत्यंत उपकारक ठरले. संत साहित्याचे, चळवळीचे आध्यात्मिक आणि वाङ्मयीन कर्तृत्व फार मोठे आहे. सर्व संतांना सामाजिक बदल अभिप्रेत होता. तोच त्यांचा आधारही होता. संतांना चातुर्वण्यव्यवस्था मान्य नव्हती. ही व्यवस्था परिवर्तनास अनुकूल नसणारी आणि भेदभाव व विषमता वाढीस लावणारी होती. या वातावरणात गोरगरीब वर्ग भरडला जात होता. परंतु संत साहित्याने सर्व जातधर्माच्या लोकांना समतेची, बंधुत्वाची शिकवण देऊन एकत्र आणले. ही किमया फक्त वारकरी पंथ करु शकला. संत ज्ञानेश्वर यांनी संत साहित्याचा पाया रचला. ज्ञानदेवे रचिला पाया । उभारले देवालया ॥ त्यांनी सर्वांसाठी विश्वात्मक देवाजवळ पसायदानाच्या रुपाने प्रार्थना केली. दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्य पाहो । जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥ असे मागणे मागितले. जे आपण भोगले ते इतरांना भोगायचे काम पडू नये, असे त्यांना वाटत होते.

*पसायदान प्रार्थनेची उपयुक्तता*

*सर्वेपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।*

*सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःख माप्नुयात !!*

पसायदानाचे सार या वैदिक प्रार्थनेत ध्वनित होते. जागतिकीकरण, वैश्विकीकरण हे शब्द आपल्याकडे आधुनिक काळात वापरण्यात येत असले तरी साधू संतांचे विचार हे पूर्वी पासूनच वैश्विक होते. तसेच ते आजही उपयुक्त आहेत. हे संत ज्ञानदेवांच्या पसायदानातील मागण्या पाहून लक्षात येते. भारतीय संस्कृतीत प्रार्थनेला अनन्यसाधारण



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in
Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

महत्व आहे. प्रार्थना हा शब्द प्र अधिक अर्थना या पासून झाला आहे. प्रकृष्ट म्हणजे श्रेष्ठ व अर्थना म्हणजे याचना किंवा मागणी करणे होय. प्रार्थना म्हणजे स्वकल्याण व इतरांच्या कल्याणासाठी ईश्वराकडे केलेली मागणी होय. प्रार्थना ही श्रद्धेने केलेले चिंतन असते.

प्रार्थनेत भावनेला महत्व असते. प्रार्थना जशी वैयक्तिक असते, तशी ती सामुहिक ही असते. सामुहिक प्रार्थनेला अधिक महत्व आहे. कारण सामुहिक प्रार्थना समाजमनाला घडवीत असते. प्रार्थनेने मन शुद्ध होते, चित्त निर्मल होते. प्रार्थनेने विकार नाहीसे होतात. मनाच्या शांतीसाठी नित्य प्रार्थना केली गेली पाहिजे. मानसिक आरोग्यासाठी प्रार्थना औषधीप्रमाणे उपयुक्त आहे. जर्मनीत प्रार्थनेच्या उपयुक्ततेबाबत संशोधन झाले व विविध अभ्यासक्रमात प्रार्थनेचा समावेश केला गेला. भारतीय इतिहासात आपणास असे दिसून येईल की, स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, विनोबा भावे, साने गुरुजी अशा अनेक महापुरुषांच्या जीवनात प्रार्थनेला अनन्यसाधारण महत्व होते.

पसायदान ही एक वैश्विक प्रार्थना आहे. कारण या प्रार्थनेत केवळ विश्वकल्याणाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. ज्ञानदेवांचे पसायदान हे माणसातील देवत्वाचे, धर्मशीलतेचे उद्गान आहे. माणसाच्या माणुसकीला उन्नत करणारे आनंदनिधान आहे. पसायदान हे ज्ञानेश्वरांचे भव्यदिव्य असे स्वप्न आहे. पसायदानात ज्ञानदेवांनी विश्वाचे मांगल्य व सर्व मानव समाजाला सुख प्राप्त व्हावे असे प्रार्थिले आहे. मानवाच्या मनात पावित्र्य, प्रेम निर्माण व्हावे, मनाला सामर्थ्य लाभावे, म्हणून ज्ञानदेवांनी पसायदान मागितले आहे.

आपल्या श्रीगुरुंकडे मागणे मागतांना त्यांनी खलवृत्तीचा प्रथम विचार केला आहे. मानवातील खलवृत्तीचा नाश होऊन त्यात सत्कर्म करण्याची वृत्ती निर्माण होण्याची मागणी ते करीत आहेत. माणसाला श्रेष्ठत्व प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य पसायदानात आहे. संपूर्ण त्रैलोक्य सुखाने पूर्ण व्हावे. सर्वांना भक्तीची आवड निर्माण व्हावी. खरे तर या प्रार्थनेने मानवी मनाला सौंदर्य दिले आहे, विचारांची समृद्धी दिली आहे, सांस्कृतिक श्रीमंती दिली आहे. उत्कर्षाची, मांगल्याची, पावित्र्याची जोड देऊन मानवी जीवन सुदृढ केले आहे. मानवी मनातील स्वार्थ, अहंकार, नाहीसा करून मन सुयोग्य मार्गाकडे वळविले आहे. मनाचा विकास केला आहे. स्वतःचे सुख इतरांच्या सुखात पाहावे अशी उदात्त शिकवण दिली आहे. खरे तर हाच भारतीय संस्कृतीचा धागा आहे. जो माऊलींनी पकडून तुमच्या पुढे ठेवला आहे. याच तत्वज्ञानातून संस्कृतीने भारताला देशीपणाचा साज चढविण्याची उत्कृष्ठ कामगिरी बजावली आहे. याच काव्यात्मक तत्वज्ञानाने भारतीयांची भक्तीभावना तेजाने तळपून सामर्थ्यशाली बनली आहे.

*किंबहुना तुमचे केले ! धर्म कीर्तन हे सिद्धी गेले!*

*येथ माझे जे उरले! ते पाईक पण!!*

ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरी ग्रंथ पूर्ण झाल्यावर म्हणतात, आता फार काय सांगावे, तुमच्या कृपाप्रसादाने केलेले हे धर्माचे व्याख्यान पूर्ण झाले आहे. येथे ग्रंथ कर्तृत्वाविषयी माझे केवळ सेवकपण उरले आहे. हे सर्व तुम्हीच माझ्याकडून करून घेतले आहे, असा नम्र भाव प्रगट करून आपल्या दैवत असणाऱ्या श्रीगुरुकडे मागणे मागण्यास सुरुवात करतात.

*आता विश्वात्मके देवे ! येणे वाग्यज्ञे तोषावे !*

*तोषोनि मज द्यावे ! पसायदान हे !!*



Smt. R.D. Patil Social Work College, Khadki, AKOLA
College Code 225
Scanned with OKEN Scanner

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in
Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

हे गुरूदेव ! आता विश्वाचा आत्मा असलेले आपण या वाग्यज्ञरुपी सेवेने सुखी होऊन, प्रसन्न होऊन मला इतकेच पसायदान द्यावे. मी जे मागत आहे, माझी जी प्रार्थना आहे ती आपण मला द्याल यात शंका नाही. पण ती मागणी आपण संतुष्ट होऊन मज द्यावी अशी माझी लडिवाळ इच्छा आहे. आता काय हवे ते मागणी मागतात.

*जे खळांची व्यंकटी सांडो! तया सत्कर्मी रती वाढो!*
*भूता परस्परे पडो । मैत्र जीवांचे !!*

जगात सज्जन लोक सुखा-समाधानाने नांदू लागतील तेव्हाच जगाची स्थिती उत्तम राहील. आसुरी प्रवृत्तीचे लोक वाढले तर ते स्वार्थाने प्रेरित होऊन सज्जनांचा अनन्वित छळ करतील, दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांच्या मनात बदल घडून आणला तरच सज्जनांचे रक्षण होईल, हे जाणून ज्ञानदेवांचे पहिले मागणे हे ठरले. जगामध्ये माणसांचे सर्वसामान्यपणे तीन प्रकार करता येतात.

१. जे लोक आपल्या हिताचा विचार न करता परहीतच करतात, ते सत्पुरुष असतात.
२. जे स्वतःचे व इतरांचे हित साधतात, ते सामान्य पुरुष असतात.
३. जे पर हितात बाधा आणतात, दुसऱ्यांचे अहित चिंतितात, ते मनुष्य रुपातले राक्षस असून, त्यांना खल असे म्हणतात.

कुणावरही दया न करणे, विनाकारण भांडणे, पर धनाची इच्छा करणे, पर स्त्रीची अभिलाषा धरणे, सज्जनांचा छळ करणे हे सर्व दुष्टांचे सुप्रसिध्द गुण आहेत. दुर्दैवाने ही मानसिकता आज बळावत आहे, म्हणून ज्ञानेश्वरांचे हे मागणे आजही प्रासंगिक व उपयुक्त आहे.

पुढे मागतात, *दुरितांचे तीमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्य पाहो !*
*जो जे वांछील तो ते! लाहो प्राणी जात !!*

पापरूपी अंधार नष्ट करून स्वधर्माचा सूर्य प्रकाश सर्वांच्या जीवनात पाडण्याचे सामर्थ्य पसायदानात आहे. दुर्जनांचा दृष्ट स्वभाव जावो, दुःखीतांचे दुःख दूर होवो. जे पापी असतील त्यांचे पाप नष्ट होवो. शास्त्रात एकूण नऊ प्रकारचे पातके सांगितली जातात. अशा पातकात असणे हेच तिमिर आहे, यातून बाहेर आले पाहिजे. म्हणून माऊली मागतात दुरिताचे तिमिर जावो. अशा पातक करणाऱ्या लोकांच्या मनातील हा दुष्टपण जावो, पाप करण्याची वृत्ती जावो व त्यात सत्कर्म करण्याची इच्छा वाढो. सर्वांनी स्वधर्म पाळला की, त्यांच्या मनात चांगले विचार येतील व ते जे काही मागतील ते जगाच्या कल्याणासाठी असेल. प्राणिमात्रांच्या सदिच्छा फलद्रूप होवोत, म्हणजे जो त्या सत्य, प्रिय व हितकर वस्तूची अपेक्षा करील, ती त्याला प्राप्त होवो. सर्वांना सुख समाधान लाभावे, अशी मागणी ज्ञानदेव करतात.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी दुष्टांचा नाश व्हावा असे मागितले नाही, तर त्यांच्यातील दुष्टपणाचा नाश व्हावा असे मागितले आहे. दुष्टांचा नाश करण्याचे काम देवाचे असते, तर दुष्टांना सज्जन करण्याचे काम संतांचे असते. दुष्टांच्या दुष्टतेचा नाश झाला व सज्जनपणा आला की, ते सर्वांचे मित्र होतात. या पद्धतीने संपूर्ण समाज मित्रत्वाच्या भावनेने उत्कृष्ठ बनेल. एका उच्च विचारधारेचा समाज निर्माण होईल, हे ज्ञानदेवांचे उच्च व उदात स्वप्न आहे.

समाजाला उत्तम मार्ग दाखविण्याचे कार्य संत करीत असतात. म्हणून ईश्वरनिष्ठ असलेले संतांचा समुदाय, समूह, दिंडी भूतलावर सगळीकडे मांगल्याचा, सुंदर विचारांचा वर्षाव करीत सदैव सर्व भूतमात्रांना सदैव भेटत राहोत. संत काय करतात जगाला परमात्म प्राप्तीचा मार्ग दाखवितात.



Smt. R.D. Patil Social Work College, Khadki, AKOLA — College Code 225
Scanned with OKEN Scanner

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in
Arts, Commerce, Education & Social Sciences
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ISSN 2277-8071
INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ICV 2023: 74.40
www.ycjournal.net

अशा दोन्ही प्रकारच्या मांगल्याचा वर्षाव करीत संत अविरत या भू मंडळात भ्रमण करीत असतात व ज्यांना भेटतात त्यांचे कल्याण करतात. म्हणून यांची सदैव मनुष्यमात्रांना भेटी होत राहोत, अशी ही मागणी आहे. संत हे जगाच्या कल्याणसाठी प्रयत्न करतात म्हणून त्यांचे गुणगान माऊली करतात.

ज्ञानदेव आपल्या श्रीगुरुदेवास म्हणतात, हे गुरुदेवा! आता तुमच्या जवळ मी जास्त काय मागू? मला आता असा वर द्या सर्वसुखाने पूर्ण होऊन या संपूर्ण त्रैलोक्याने आदिपुरुषाचे भजन करावे.

आणि हे गुरुदेवा ! आता मला शेवटचे मागणे मागायचे आहे. ते म्हणजे, या मृत्युलोकामध्ये विशेषतः जे ग्रंथोपजीवी (ज्ञानेश्वरी ग्रंथाचा अभ्यास करणारे) लोक आहेत त्यांना दृष्ट व अदृष्टाच्या बाबतीत विजयी कर. आता खरा विचार करायचा तो ग्रंथोपजीवी कोणाला म्हणावे? ग्रंथावर उपजीविका करणारे म्हणजे जो ग्रंथ ज्यांचा उपजीव्यभूत झाला आहे तो.

खरे तर ग्रंथांचा विचार केला तर ग्रंथ कोणते आहेत. संतकृत ग्रंथ ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकाराम गाथा. या लोकात ज्ञानेश्वरीला प्रमाण मानून जीवन जगणारे ग्रंथोजीवी होत. यांचा दोन्ही ठिकाणी विजय निश्चित होणारच.

•येणे वरे ज्ञानदेवो ! सुखिया झाला !!•

मानवी मूल्यांची निर्मिती व संवर्धन ही नैसर्गिक प्रक्रिया नसून ती समाजरचनेशी निगडित असते. कुटुंब, शिक्षणसंस्था, धर्म, शासनव्यवस्था, माध्यमे, सामाजिक संस्था हीच ती सामाजिक संसाधने जी व्यक्तीच्या विचारसरणीला आकार देतात. या संसाधनांच्या माध्यमातून प्रामाणिकपणा, जबाबदारी, सहकार्य, शिस्त, न्याय, समता यांसारखी मूल्ये विकसित होतात. सामाजिक संसाधनांचा योग्य वापर झाला तर समाजात सौहार्द, एकात्मता व प्रगती साधता येते; पण त्यांचा दुरुपयोग झाला तर मूल्यह्रास, असमानता व संघर्ष वाढतो. त्यामुळे सामाजिक संसाधने ही मानवी मूल्यांची भक्कम पायाभूत साधने मानली जातात.

**१. कुटुंब :**

मानवी मूल्यांची पहिली शाळा म्हणजे कुटुंब होय. बाल्यावस्थेत व्यक्तीचे विचार, भावना आणि वर्तन यांचा पाया कुटुंबामध्येच रचला जातो. प्रेम, करुणा, सहकार्य, जबाबदारी, प्रामाणिकपणा, शिस्त, परस्पर आदर यांसारखी मूलभूत मानवी मूल्ये सर्वप्रथम कुटुंबाच्या वातावरणातून व्यक्तीमध्ये विकसित होतात. कुटुंब केवळ जैविक गरजा पूर्ण करत नाही, तर ते समाजातील सांस्कृतिक परंपरा, धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक मूल्ये पुढील पिढीकडे हस्तांतरित करते. म्हणूनच कुटुंबाला मानवी मूल्यांचा प्राथमिक स्त्रोत असे संबोधले जाते.

आजच्या बदलत्या सामाजिक रचनेत अणुकुटुंब, शहरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे कुटुंबव्यवस्थेत अनेक बदल झाले आहेत. तरीदेखील कुटुंबाचे मूल्यसंवर्धनातील योगदान आजही तितकेच महत्त्वाचे आहे.

**२. समाज व समुदाय:**

समाज म्हणजे केवळ व्यक्तींचा समूह नव्हे, तर परस्परावलंबन, सहकार्य आणि मूल्याधिष्ठित आंतरसंबंधांचे एक जाळे होय. सहजीवन, सहकार्य, बंधुभाव, सहिष्णुता, लोकशाही वृत्ती, सामाजिक न्याय यांसारखी मूल्ये समुदायातील परस्परसंवादातून विकसित होतात. समाज व समुदाय हे केवळ मूल्यांचे संवर्धनच करत नाहीत, तर त्या मूल्यांना व्यवहारात आणण्याची संधी आणि चौकट उपलब्ध करून देतात. म्हणूनच मानवी मूल्यांच्या जडणघडणीसाठी समाज आणि समुदाय यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते.

**३. शिक्षणसंस्था:**

कुटुंबानंतर व्यक्तीचे संगोपन, व्यक्तिमत्त्व विकास आणि मूल्यसंस्काराची जबाबदारी शिक्षणसंस्था पार पाडतात. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे ही केवळ ज्ञानप्रदानाची केंद्रे नसून व्यक्तीमध्ये प्रामाणिकपणा, जबाबदारी, शिस्त,

RESEARCH NEBULA
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
www.ycjournal.net
Impact Factor 8.137
ISSN 2277-8071
Special Issue September 2025

सहकार्य, सहिष्णुता, लोकशाही विचारसरणी आणि सामाजिक बांधिलकी यांसारखी मूल्ये रुजविण्याची शाळा असतात. शिक्षणसंस्था मधून विद्यार्थ्यांमध्ये मानवी मूल्यांची जडणघडण घडते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे (NEP 2020) मध्येही मूल्याधारित शिक्षणावर भर देण्यात आला आहे.

**४. शासन व कायदा:**

समाजातील सुव्यवस्था, शांती आणि न्याय टिकवून ठेवण्यासाठी शासन आणि कायदा ही दोन महत्त्वाची साधने आहेत. मानवी मूल्ये केवळ वैयक्तिक वर्तनापुरती मर्यादित नसून ती सामाजिक संरचनेला आधार देतात. शासनव्यवस्था आणि कायदा यांच्यामार्फत प्रामाणिकपणा, समानता, न्याय, जबाबदारी, लोकशाही, मानवाधिकार आणि कर्तव्यभावना यांसारखी मूलभूत मानवी मूल्ये व्यवहारात आणली जातात.

**५. माध्यमे:**

आधुनिक समाजात माध्यमे ही लोकांच्या विचारसरणी, वृत्ती आणि जीवनशैली घडविणारी प्रभावी शक्ती मानली जातात. मानवी मूल्यांची निर्मिती व संवर्धनात माध्यमांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. माध्यमांच्या माध्यमातून प्रामाणिकपणा, सत्य, न्याय, सहिष्णुता, समता, पर्यावरण-जागरूकता, देशभक्ती आणि मानवतेची भावना यांचा प्रसार होऊ शकतो. जनजागृती मोहिमा, शैक्षणिक कार्यक्रम, प्रेरणादायी कथा, तसेच सामाजिक समस्यांवरील चर्चासत्रे यांद्वारे माध्यमे मूल्याधिष्ठित समाजरचनेला बळकटी देतात.

**४. सांस्कृतिक संसाधने व मानवी मूल्ये:**

मानवी जीवनाचा गाभा संस्कृतीत दडलेला असतो. संस्कृती म्हणजे केवळ कला, साहित्य किंवा परंपरा नसून ती जीवनपद्धती, विचारसरणी, आचारधर्म आणि मूल्यव्यवस्था यांचा एकत्रित वारसा आहे. प्रत्येक समाज आपली संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी विविध साधनांचा उपयोग करतो; ही साधनेच म्हणजे सांस्कृतिक संसाधने होय. धर्म, परंपरा, सण-उत्सव, लोककला, साहित्य, संगीत, नाट्य, चित्रकला, ऐतिहासिक वारसा, लोककथा आणि लोकपरंपरा या सर्व सांस्कृतिक संसाधनांद्वारे मानवी मूल्यांची जोपासना होते. करुणा, सहिष्णुता, सौंदर्यबोध, ऐक्य, देशभक्ती, आध्यात्मिकता आणि मानवतेची भावना ही मूल्ये संस्कृतीच्या माध्यमातून पिढ्यान् पिढ्या हस्तांतरित होतात.

आजच्या जागतिकीकरणाच्या व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सांस्कृतिक संसाधनांचे जतन आणि पुनरुज्जीवन ही काळाची गरज आहे. कारण संस्कृती जिवंत राहिली तरच मानवी मूल्यांचे अधिष्ठान टिकून राहू शकते. म्हणूनच सांस्कृतिक संसाधने ही मानवी मूल्यांची संवर्धक व बळकट करणारी प्रमुख साधने मानली जातात.

**अ. परंपरा व रूढी:**

समाजाच्या सातत्यपूर्ण अस्तित्वासाठी आणि एकात्मतेसाठी परंपरा व रूढी महत्त्वाची भूमिका बजावतात. परंपरा म्हणजे पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या प्रथा, विचारसरणी, श्रद्धा आणि जीवनशैली, तर रूढी म्हणजे समाजमान्य वर्तनपद्धती व नियम. या दोन्हींच्या माध्यमातून समाज व्यक्तीच्या जीवनाला दिशा देतो व मूल्यांचे संवर्धन करतो. उदा. ज्येष्ठांचा सन्मान, अतिथी देवो भव, सण-उत्सवांतील सामूहिकता, धार्मिक विधींतील शिस्त, लोककथांतील नैतिक धडे - हे सर्व मानवी मूल्यांना दृढ करणारे घटक आहेत.

**ब. धर्म व अध्यात्म :**

मानवी जीवन केवळ भौतिक सुखसोयींवर टिकून राहत नाही; त्याला नैतिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक आधाराचीही आवश्यकता असते. धर्म व अध्यात्म या दोन्हींच्या संयोगातून प्रामाणिकपणा, करुणा, अहिंसा, बंधुभाव, सेवा



Scanned with OKEN Scanner

वृत्ती, संयम, समानता व सार्वत्रिक प्रेम यांसारखी मानवी मूल्ये घडतात. म्हणूनच धर्म व अध्यात्म ही मानवी मूल्यांच्या जडणघडणीतील दोन अत्यावश्यक स्तंभ मानले जातात.

**क. साहित्य व तत्त्वज्ञान:**

साहित्य आणि तत्त्वज्ञान ही दोन अशी क्षेत्रे आहेत जी मानवी जीवनाला बौद्धिक, नैतिक आणि संवेदनशील अधिष्ठान देतात. साहित्य म्हणजे मानवी अनुभवांचे कलात्मक प्रतिबिंब. कथा, कविता, नाटक, कादंबरी आदींच्या माध्यमातून साहित्य समाजातील सत्य, सौंदर्य, दुःख, अन्याय, आशा आणि संघर्ष यांचे दर्शन घडवते. त्यामुळे वाचकाच्या मनात करुणा, सहानुभूती, न्यायबुद्धी आणि मानवतावादी दृष्टिकोन विकसित होतो.

तत्त्वज्ञान मात्र जीवनाचा गाभा शोधते. "सत्य काय?", "जीवनाचा उद्देश काय?" अशा मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधताना तत्त्वज्ञान व्यक्तीला विचारशील बनवते. तर्कशुद्धता, विवेकबुद्धी, समतोल, आत्मपरीक्षण आणि जीवनमूल्यांचा सखोल बोध तत्त्वज्ञानातून प्राप्त होतो. म्हणूनच साहित्य व तत्त्वज्ञान हे मानवी मूल्यांचे समृद्ध करणारे, बळकट करणारे आणि कालसुसंगत मार्गदर्शन देणारे प्रमुख सांस्कृतिक स्रोत मानले जातात.

**ड. कला, संगीत व नाट्य:**

मानवी संस्कृतीचे हृदय म्हणजे कला. नाट्य, कला आणि संगीत या सर्जनशील अभिव्यक्तीच्या माध्यमातून मानवाच्या भावविश्वाला आणि विचारविश्वाला दिशा मिळते. या कलारूपांमध्ये केवळ मनोरंजन नसते, तर ते समाजाला जागरूक करणारे, विचारप्रवर्तक आणि मूल्यसंवर्धन करणारे साधन ठरतात. म्हणूनच नाट्य, कला आणि संगीत ही केवळ कलात्मक परंपरा नसून मानवी मूल्यांच्या जडणघडणीतील प्रेरणास्त्रोत आहेत.

**इ. इतिहास व वारसा:**

इतिहास व वारसा केवळ भूतकाळाची माहिती पुरविणारे स्रोत नाहीत, तर मानवी मूल्यांच्या जडणघडणीतील आधारस्तंभ आहेत, जे समाजात शाश्वतता, नैतिकता आणि सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवतात.

**५. सामाजिक व सांस्कृतिक संसाधनांसमोरील समकालीन आव्हाने :**

मानवी मूल्यांचे संवर्धन आणि प्रसार हे समाजातील सामाजिक व सांस्कृतिक संसाधनांवर अवलंबून असते. कुटुंब, शिक्षणसंस्था, धर्म, परंपरा, कला, साहित्य, माध्यमे व समुदाय हे मूल्यांचे स्तंभ आहेत. तथापि, आजच्या गतिमान व जागतिकीकरणाच्या युगात या संसाधनांसमोर अनेक आव्हाने उभ्या आहेत.

**अ. जागतिकीकरणाचा प्रभाव:**

जागतिकीकरणामुळे परदेशी संस्कृती, जीवनशैली व मूल्ये स्थानिक संस्कृतीवर प्रभाव टाकत आहेत. परिणामी, पारंपरिक मूल्यांचा ह्रास होत आहे.

**ब. तंत्रज्ञान व सोशल मीडिया:**

सोशल मीडिया व तंत्रज्ञानामुळे लोकांच्या विचारसरणीवर जलद प्रभाव पडतो. चुकीची माहिती, हिंसात्मक, अपमानजनक किंवा भेदभाव निर्माण करणारे संदेश यामुळे मूल्यह्रासाची भीती वाढते.

**क. भौतिकतावाद व व्यक्तिवाद:**

भौतिक सुखसोयींवर अधिक भर देणे, स्पर्धात्मक वृत्ती व व्यक्तिवाद हे सामाजिक बंधुभाव, सहकार्य व नैतिक मूल्ये कमी करण्यास कारणीभूत ठरतात.

**ड. कुटुंब व समाजरचनेतील बदल:**

Smt. P.D. Patil Social ... College Code 225 ... AKOLA



Scanned with OKEN Scanner

RESEARCH NEBULA
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
www.ycjournal.net
Impact Factor 8.137
ISSN 2277-8071
Special Issue September 2025

अणुकुटुंब, शहरीकरण व कार्यजीवनाचा ताण यामुळे पारंपरिक सामाजिक आणि सांस्कृतिक समर्थन व्यवस्था कमजोर होत आहे.

**इ. धार्मिक व सांस्कृतिक संघर्ष:**

विविध धर्म, जात, भाषा व संस्कृतीतील मतभेदांमुळे सहिष्णुता, एकात्मता व सामंजस्य टिकवणे कठीण झाले आहे.

**फ. शैक्षणिक व सांस्कृतिक अवकाशाचा अभाव:**

विद्यार्थ्यांना नैतिक व मूल्याधिष्ठित शिक्षण देण्यासाठी शाळा व महाविद्यालये पुरेशी संसाधने किंवा वेळ देत नाहीत, त्यामुळे मूल्यांची जडणघडण अपूर्ण राहते.

यावर मात करण्यासाठी सशक्त मूल्यशिक्षण, सांस्कृतिक पुनरुज्जीवन, सामाजिक बांधिलकी, शिक्षणसंस्था व माध्यमांच्या सकारात्मक भूमिकेचा प्रसार गरजेचा आहे.

**६. सामाजिक व सांस्कृतिक संसाधनांसमोरील संधी:**

सामाजिक व सांस्कृतिक संसाधने मानवी मूल्यांच्या संवर्धनासाठी केवळ आव्हाने निर्माण करत नाहीत, तर या संसाधनांच्या योग्य वापरातून मूल्यसंवर्धनाची प्रचंड संधी देखील उपलब्ध होते.

**अ. शिक्षण व मूल्यशिक्षण:**

शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे ही मूल्याधिष्ठित जीवनदृष्टी विकसित करण्यासाठी आदर्श केंद्रे आहेत. नैतिक शिक्षण, सहकारी उपक्रम, नैतिक व सामाजिक प्रकल्प यांद्वारे विद्यार्थी प्रामाणिकपणा, जबाबदारी, सहकार्य, सहिष्णुता आणि लोकशाही वृत्ती यांसारखी मूल्ये आत्मसात करू शकतात.

**ब. सांस्कृतिक पुनरुज्जीवन:**

नाट्य, संगीत, कला, साहित्य, सण-उत्सव, परंपरा व वारसा यांचा प्रचार व जतन करून मूल्यांचा प्रसार करता येतो. यामुळे पिढ्यान् पिढ्या मूल्यांचे हस्तांतरण सहज साध्य होते.

**क. माध्यमांचा सकारात्मक वापर:**

सोशल मीडिया, दूरदर्शन, रेडिओ आणि डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे मानवतेची भावना, सहिष्णुता, करुणा, शांती, पर्यावरण-जागरूकता यांसारखी मूल्ये लोकांपर्यंत पोहोचवता येतात.

**ड. समाजातील सहभाग व सामूहिक उपक्रम:**

स्वयंसेवी संस्था, सामाजिक मोहिमा, सार्वजनिक चर्चासत्रे, सामूहिक कार्यक्रम आणि समुदाय आधारित उपक्रम यांमुळे सहकार्य, एकात्मता, सामाजिक बांधिलकी आणि न्यायबुद्धी यांसारखी मूल्ये वाढतात.

**इ. आंतरधर्मीय आणि आंतरसंस्कृती संवाद:**

विविध धर्म, संस्कृती आणि समुदाय यांच्यातील आदान-प्रदानामुळे सहिष्णुता, सौहार्द आणि सार्वत्रिक मानवतावाद यांचे मूल्य दृढ होते.

**फ. सकारात्मक उदाहरणे व आदर्श व्यक्तिमत्त्व:**

शिक्षक, समाजसेवक, सांस्कृतिक नेते, कलाकार आणि सार्वजनिक व्यक्तिमत्त्व यांचे प्रेरणादायी वर्तन मूल्यसंवर्धनाची संधी निर्माण करते.

Smt. P.D. Patil Social Work College Code 225



Scanned with OKEN Scanner

RESEARCH NEBULA
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
www.ycjournal.net
Impact Factor 8.137
ISSN 2277-8071
Special Issue September 2025

यातून स्पष्ट होते की, सामाजिक व सांस्कृतिक संसाधने ही मानवी मूल्यांचा विकास, प्रसार आणि दीर्घकालीन जतन करण्याची प्रचंड साधने आहेत, ज्या योग्य मार्गदर्शनाने समाजात नैतिकता, सहकार्य, सहिष्णुता आणि समता प्रस्थापित करू शकतात.

**७. निष्कर्ष**

मानवी मूल्यांचा पाया हा सामाजिक व सांस्कृतिक संसाधनांवर आधारित आहे. कुटुंब, शिक्षणसंस्था, शासन व माध्यमे ही सामाजिक संसाधने मूल्यांना संरचना व व्यवहार्य चौकट देतात; तर धर्म, साहित्य, कला, परंपरा व वारसा ही सांस्कृतिक संसाधने मूल्यांना आध्यात्मिक व प्रतीकात्मक बळकटी देतात.

आजच्या बदलत्या समाजात मूल्यह्रासाची चिंता असली तरी योग्य धोरणे, शिक्षण व सांस्कृतिक पुनरुज्जीवनाद्वारे मूल्यांचा पुनःसंवर्धन शक्य आहे. समाज व संस्कृतीची ही दुहेरी शक्ती भविष्यातील पिढ्यांसाठी न्याय, शांती, करुणा व सहजीवन यांचे दृष्टीकोन मजबूत करू शकते.

**संदर्भ (References):**

1. Rokeach, M. (1973). The Nature of Human Values. New York: Free Press.
2. Schwartz, S. H. (2012). An Overview of the Schwartz Theory of Basic Values. Online Readings in Psychology and Culture.
3. Parsons, T. (1964). Social Structure and Personality. New York: Free Press.
4. Gandhi, M. K. (1927). An Autobiography: The Story of My Experiments with Truth. Navajivan.
5. Durkheim, E. (1912). The Elementary Forms of Religious Life. Paris.
6. National Education Policy (NEP), Government of India, 2020.
7. Kumar, A. (2016). Education and Human Values. New Delhi: APH Publishing.
8. Bhargava, R. (2005). Political Theory: An Introduction. Pearson.
9. UNESCO (2017). Culture and Development Indicators.
10. Indian Council of Social Science Research (ICSSR) Reports on Value Education.

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225



Scanned with OKEN Scanner

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**October - 2025**

ISSUE No - (DXXX) 530

## Social Work Interventions for Sustainable Development: Opportunities & Challenges






**Chief Editor**
Dr. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. Narhari G. Patil

**Editor**
Dr. Ambadas Kardile

Jawaharlal Nehru College of Social Work
CIDCO, Nanded, Maharashtra 431603

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Wadgi, AKOLA

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – (SJIF) –8.632 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

**Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

## October - 2025

**ISSUE No - (DXXX ) 530**

Social Work Interventions for

Sustainable Development: Opportunities & Challenges

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. Narhari G. Patil**
Executive-Editors
Jawaharlal Nehru College of Social Work
CIDCO, Nanded, Maharashtra 431603

**Dr. Ambadas Kardile**
Editor
Jawaharlal Nehru College of Social Work
CIDCO, Nanded, Maharashtra 431603

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

## INDEX

| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Role of Social Legislation in Sustainable Development in India **Prof. Umesh D Wani** | 1 |
| 2 | Organic Farming and Initiatives of AWARD in Sustainable Development **Dr. Vijay Jaysing Mane** | 3 |
| 3 | Learning in Inequality: Digital Exclusion of Tribal and Rural Students in Maharashtra **Prashant Vikas Karale** | 8 |
| 4 | Transgender Community Inclusions in Sustainable Development Goals Implementation: Barriers and Strategies **Chitra Sharad Thanage,,Dr. Shaikh Asifoddin Ainoddin,** | 13 |
| 5 | Social Work Intervention in Mental illness For Sustainable Development Goals **Dr.Narhari Patil** | 16 |
| 6 | Integrating Mental Health into the Sustainable Development Goals: A Social Work Perspective on Addressing a Neglected Priority **Dr. Shaikh Asifoddin Ainoddin** | 19 |
| 7 | Use of Virtual Reality in Social Work Counseling for Traumatized Children **Nilesh Devising Rathod** | 27 |
| 8 | Workplace Stress and Its Impact on Mental Health: Challenges and Social Work Interventions **Dr. S. N. Bhadarge** | 31 |
| 9 | A Study on Social Work Intervention in Disaster Management **Dr. Shinde Shivaji Sambhaji** | 34 |
| 10 | Mental Health, Family Functioning, and Quality of Life among Parents of Children with Intellectual Disability: A Cross-Sectional Study **Ms.Pranita Pandit Barge1 ,Dr.Shrikant Pawar** | 38 |
| 11 | A Cross-Sectional Study of Occupational Stress and Coping Strategies among Police Professionals in Pune **Mr.Sushil sunil shelke, Dr.Ashwini Dhembare** | 43 |
| 12 | सामाजिक न्याय, समानता व लोकशाही मूल्य वृद्धीसाठी समाजकार्य शिक्षणाची भूमिका **सहा.प्रा.डॉ.हर्षल दादाराव बोरचाटे** | 47 |
| 13 | हवामान बदल, आपत्ती व्यवस्थापन व शाश्वततेत समाजकार्य हस्तक्षेप **प्रा. सुरेश आशन्ना कंती** | 53 |
| 14 | महिलांचे प्रजनन आरोग्य: आव्हाने आणि उपाय - एक अभ्यास **अरुण विठ्ठलराव शेटे,डॉ. ए.ए.शेख** | 58 |
| 15 | सामाजिक व मानसिक आरोग्य क्षेत्रातील समाजकार्याची भूमिका **डॉ. लखन दिगांबर कत्तेवार** | |
| 16 | शाश्वत विकासात समाजकार्यातील क्षेत्रकार्याची भूमिका **शिरसे बुध्दभूषण माधवराव** | 70 |
| 17 | शाश्वत विकासात शिक्षणाची भूमिका **डॉ. बळवंत पाटील** | 75 |
| 18 | शाश्वत सामाजिक विकास आणि लैंगिक समानता **प्रा.मनोहर वागतकर** | 80 |
| 19 | शाश्वत गाव विकास संकल्पना आणि समाजकार्य हस्तक्षेप, संदर्भ : पठाण मांडवा, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड **डॉ. हनुमंत अंगदराव साळुंके** | 85 |



Sau. S.K. Patil Social Work College ... College Code 225

Scanned with OKEN Scanner

ISSN : 2278-9308
October 2025

# शाश्वत विकासात शिक्षणाची भूमिका

**डॉ. बळवंत पाटील**
सहाय्यक प्राध्यापक, श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला
मो. 9422342222

**सारांश:**

युनोने 2005-2015 हे दशक चिरंतन विकासासाठीच्या शिक्षणाचे दशक असे जाहीर केले होते..1983 मध्ये World Commission on Environmental Development येथे Brudtlant यांनी शाश्वत विकासाची संकल्पना मांडली. ब्रुटलँड हे या कमिशनचे अध्यक्ष होते. म्हणून याला 'ब्रुटलँड कमिशन' म्हणून ओळखले जाते. या कमीशनने शाश्वत विकासाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "Development that meets the need of the Present generation without compromising the ability of the future generation to meet their own needs."- Brudtland Commission. भावी पिढीच्या गरजा भागविण्याच्या क्षमता अबाधित राखून सध्याची वर्तमान पिढी आपल्या गरजा भागवितात. अशा विकासाला शाश्वत विकास/शाश्वत विकास म्हणतात. अशा या शाश्वत विकासात शिक्षणाची भूमिका कोणती आहे? शिक्षणामुळे शाश्वत विकास कशा प्रकारे होऊ शकतो याचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या हेतूने संशोधिकेने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

**मुख्य शब्द (Key Words) :** शाश्वत विकास, सामाजिक विकास, शिक्षणाची भूमिका

**प्रस्तावना:**

शिक्षण म्हणजे बदल-विकास. जीवनात प्रतिक्षणी मनुष्याला अनुभव येत असतात. ज्ञानेंद्रियांनी तो अनुभव घेत असतो व कर्मेंद्रियांनी धडपड करीत असतो. अनुभवांच्या प्रकाशात आपल्या वर्तनात सतत बदल करीत जातो, सुधारणा करीत जातो. याच बदलाला आपण विकास म्हणतो. हा बदल किंवा विकास म्हणजेच शिक्षण. पण हा बदल इष्ट व सुयोग्य दिशेनेच घडून आणलेला असावा. शिक्षण म्हणजे सुसंस्कार, शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास किंवा संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास. गांधीजी म्हणतात, "माणसाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगांमधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण." पेस्टॉलॉजी व फ्रोबेल या शिक्षणशास्त्रज्ञांनी माणसाच्या शैक्षणिक विकासाची तुलना बीजातून विकसित होणाऱ्या वृक्षाबरोबर केली आहे. जे गुणधर्म बिजात असतात, तेच केवळ विकसित होऊन प्रगट होतात. म्हणूनच शाश्वत विकासात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. या शाश्वत विकासात शिक्षक, विद्यार्थी, शाळा तसेच पर्यावरण यासर्वांचा विकास अभिप्रेत आहे. शाश्वत विकासात शिक्षणाची भूमिका अधिक सुस्पष्ट होण्याच्या हेतूने संशोधिकेने प्रस्तुत संशोधन हाती घेतले आहे.

**समस्या विधान:**

शाश्वत विकासातील शिक्षणाची भूमिका.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1) शाश्वत विकासाची गरज व संकल्पना अभ्यासणे.
2) पर्यावणाच्या शाश्वत विकासासाठीच्या जागतिक जनजागृतीचा अभ्यास करणे.
3) शाश्वत विकासातील शिक्षणाची भूमिका अभ्यासणे.



P.D. Patil Social Work College
College Code 225

Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DXXX) 530
ISSN : 2278-9308 October 2025

**विषयविवेचन - शाश्वत विकासाची गरज:**

सुविधा आणि संपत्तीचा अतिहव्यास, त्याचबरोबर अफाट लोकसंख्येमुळे वाढत्या गरजा यांच्यापोटी पृथ्वीवरील नैसर्गिक साधन सामग्रीचा वापर सध्या धोकादायक स्थितीत पोहोचला आहे. त्यामुळे होणाऱ्या पर्यावरण ऱ्हासाचे दुष्परिणाम केवळ सजीवांच्या काही विशिष्ट जातीपुरते मर्यादित रहाणार नाहीत तर भावी मानवी पिढ्यांचे जीवन धोक्यात येईल ही सद्यःस्थिती आहे. अनेक दिशांनी पर्यावरण रक्षणाच्या प्रयत्नांचा जगभर प्रारंभ झालेला आहे. भविष्यातील मानवी पिढयांच्या जीवनाचे भवितव्य पूर्णतः आपल्या युवक आणि विद्यार्थ्यांच्या हाती आहे. पर्यावरण शिक्षण देताना जर कृतीची जोड दिली तर त्या ज्ञानाचे उपयोजन विद्यार्थ्यांना दैनंदिन व्यवहारात करता येते. मानव हा पर्यावरणातील एक घटक आहे. पर्यावरणाचे संतुलन साधून शाश्वत विकासासाठी निसर्गातील इतर घटकांबरोबरच मानवही तितकाच महत्वाचा घटक आहे. शिक्षण क्षेत्रातील हा मानव म्हणजेच शिक्षक, विद्यार्थी यांचाही यामध्ये समावेश होतो. संतुलित पर्यावरणासाठी शिक्षक, विद्यार्थी यांचाही विकास अपेक्षित आहे.

**शाश्वत विकास व्याख्या:**

जागतिक पर्यावरण आणि विकास आयोगाच्या मते, "विकासात्मक अशा कोणत्याही प्रक्रियेने पर्यावरणाची हानी होणार नाही, ज्यामुळे भावी पिढ्यांना पर्यावरणीय साधनसंपत्तीचे फायदे कायमस्वरुपी अथवा शाश्वत स्वरूपात मिळावे." मानवाने आपला विकास निसर्गाच्या तारणक्षमतेतच केला पाहिजे.

1983 मध्ये World Commission on Environmental Development येथे Brudtlant यांनी शाश्वत विकासाची संकलना मांडली.

"Sustainability is defined as meetings the basic needs of all & extending to all the opportunity to satisfy their aspirations for better Life."- Brudtland Commission.

"सर्व व्यक्तींना आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी, अधिक चांगल्या प्रकारे जीवन जगण्याचीसाठी संधी प्रप्त करून देणे म्हणजे शाश्वत/शाश्वत विकास होय." थोडक्यात नैसर्गिक साधन सामुग्रीचा विवेकपूर्ण वापर करून व्यक्तीच्या आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय गरजा भागवून भावी पिढ्यांच्या गरजा भागविण्याइतपत पर्यावरणाची गुणवत्ता कायम राखण्याचा प्रयत्न करणे म्हणजे शाश्वत विकास होय.

"भावी पिढीच्या राहणीमानाचा दर्जाच्या स्थितीत बिघाड होऊ नये या दृष्टीकोनातून सध्याच्या परिस्थितीत विचार करणे हा चिरंतन विकासाचा गाभा आहे."- रॉबर्ट रेपेटो

"सर्व व्यक्तींना आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी, अधिक चांगल्या प्रकारे जीवन जगण्यासाठी संधी प्राप्त करून देणे म्हणजे शाश्वत विकास होय."

पर्यावरणाच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनेत पुढील बाबींचा प्रकर्षाने विचार करणे आवश्यक आहे. अशाश्वत विकासाकडून शाश्वत विकासाकडे जाण्यासाठी पुढील बाबींची गरज असते

- मानवी जीवनाचे संरक्षण, विकास व राहणीमान उंचावणे.
- पृथ्वीवरील जैवविविधतेचा विकास करणे.
- अपुनर्निर्मितीक्षम संसाधनांचा गरजेपुरता वापर करणे.
- निसर्गाची तारणक्षमता जपणे.
- जागतिक स्तरावर एकत्रित पर्यावरण विकास व जपणुकीसाठी जाणीव निर्माण करणे.
- शाश्वत विकासाच्या संकल्पनांसाठी उपायोजना करणे.

शाश्वत विकासाच्या नावाखालील दरदिवशी 27 हेक्टरच्या गतीने वनसंपत्ती नष्ट होत आहे. जल, हवा आणि वायू प्रदूषणांनी ओलांडलेल्या मर्यादा, वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेल्या, कुपोषण, बेरोजगारी, इत्यादी समस्या,



P.D. Patil Social Work College
College Code 225

दरडोई शेतीचे किमी झालेले उत्पन्न, या सर्व गोष्टीवर शाश्वत विकास हाच एकमेव पर्याय आहे. म्हणूनच स्टॉकहोम परिषदेने "Only one Earth for Entire Humanity हे घोषवाक्य ठरविले आहे. निसर्गाच्या रक्षणावरुन मानवाचे अस्तित्त्व टिकणार आहे.

**पर्यावरणाच्या शाश्वत विकासासाठी जागतिक जनजागृती:**

1899- वनस्पतीशास्त्राचे स्कॉटिक अभ्यासक प्रा. गेडेस पेट्रीक यांनी एडिनबर्ग, इंग्लंड येथे 'द आऊट लुक टॉवर' नावाची संस्था स्थापन केली. - या संस्थेचे उद्दिष्ट होते. - पर्यावरण आणि शिक्षण.

- 1952-लंडन स्मॉग पर्यावरणीय मानवनिर्मित प्रदूषणामुळे 4000 लोकमृत्युमुखी पडले.
- 1963- अमेरिकेतील न्यूयॉर्क मध्ये अशाच प्रकारच्या घटनेमुळे 800 लोक मृत्युमुखी.

म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण शिक्षणाची गरज भासू लागली.

- 1962- रचेल कार्लसेन या पर्यावरण प्रेमीने 'सायलंट स्प्रिंग' या ग्रंथाद्वारे पर्यावरण ऱ्हासाची व्यथा मांडली.
- 1972- मियाडेव यांनी 'द लिमिट टू ग्रोथ' या ग्रंथाद्वारे पर्यावरणीय समस्येवर मते मांडली.
- 5 जून, 1972- स्टॉकहोम येथे आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्रसंघाची पहिली परिषद विषय – मानवी पर्यावरण. या परिषदेमुळे पर्यावरण शिक्षणाचा पाया रोवला.
- 1975 – बेलग्रेड – युगोस्लोव्हाकिया येथे आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषद - विषय – पर्यावरण शिक्षण.
- 1977 – तिबलिसी- रशिया-आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषद - विषय - पर्यावरण शिक्षण.
- 1980 – भोपाळ –NCERT ने राष्ट्रीय पर्यावरण संस्थेची स्थापना केली.
- 1981 – नवी दिल्ली – आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषद - या परिषदेमुळे भारतात पर्यावरण शिक्षणाची महर्तमेढ रोवली.
- केंद्रशासाने सर्व राज्यांना आदेश दिले की, अभ्यासक्रमात पर्यावरण हा स्वतंत्र विषय आणावा. पण सर्व राज्यांनी दुर्लक्ष केले. दरम्यान UGC नवी दिल्ली यांनी पदव्युत्तर स्तरावर पर्यावरणशास्त्र, पर्यावरण व्यवस्थापन या अभ्यासक्रमांना मान्यता दिली.
- 1992 ब्राझील रिओडीजानेरो येथे वसुंधरा शिखर परिषद विषय - पर्यावरण विचार व नैसर्गिक साधन संपत्ती यांच्यातील संतुलनावर भर.
- 18 डिसेंबर 2003 सर्वोच्च न्यायालयाने शालेय व महाविद्यालयीन स्तरावर अभ्यासक्रमात पर्यावरण शिक्षण हा विषय समाविष्ट करण्याचे आदेश दिले. NCERT ला सदर अभ्यासक्रम तयार करण्याचे आदेश दिले.
- 2005 – आग्रा येथे पर्यावरणाची आंतरराष्ट्रीय परिषद
- 2004-2005 पासून महाराष्ट्र शासनाने इयत्ता 9 वी ला पर्यावरण अभ्यास हा सक्तीचा 100 गुणांचा विषय सुरू केला. तसेच पदवी मिळविण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर पर्यावरण शिक्षण हा सक्तीचा विषय केला.
- NEP 2020 च्या काही शिफारशी - पर्यावरण शिक्षण हा शालेय अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग बनविण्यासाठी, पाणी व संसाधनांच्या संवर्धनासह पर्यावरण जागरुकता समाविष्ट करणे.

अशा प्रकारे पर्यावरण शिक्षण हा विषय सर्व स्तरावर अभ्यासला जाऊन पर्यावरणाच्या शाश्वत विकासाबाबत जनजागृती केली जात आहे. बेलग्रेड येथे 13 ते 22 ऑक्टोबर 1975 मध्ये झालेल्या कार्यशाळेमध्ये पर्यावरण शिक्षणाची पुढील उद्दिष्टे मांडली



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (DXXX) 530
ISSN : 2278-9308 October 2025

- जागरुकता
- ज्ञान
- अभिवृत्ती
- कौशल्य
- मूल्यमापन कुशलता
- प्रत्यक्ष सहभाग.

1972 च्या स्टॉकहोम परिषदेनंतर भारतामध्ये पर्यावरण रक्षणातून शाश्वत विकास साधण्यासाठी पर्यावरण विषयक कायदे केले गेले.

**पर्यावरण संरक्षणासाठीचे कायदे**

- 1972- वन्यजीव संरक्षण कायदा.
- 1974- जलप्रतिबंध व प्रदूषणनियंत्रण कायदा.
- 1980 - वनसंवर्धन कायदा. निसर्गाची तारणक्षमता जपणे.
- 1981- हवा प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण कायदा.
- 1986- पर्यावरण संरक्षण कायदा.

**शाश्वत विकासात शिक्षणाची भूमिकाः**

प्राथमिक स्तर, माध्यमिक स्तर,, महाविद्यालयीन स्तर, पदव्युत्तर पदवी सृतर, विद्यापीठ स्तर या सर्व स्तरातून पर्यावरणाच्या शाश्वत विकासासाठी अभ्यासक्रमातून, शिक्षण उद्दिष्टामधून प्रयत्न केले जातात. विविध अध्यापन पद्धतींचा वापर करून पर्यावरण शिक्षण दिले जाते. उदा. व्याख्यान पद्धती, कथाकथन पद्धती, प्रयोगशाळा पद्धती, अभ्यास सहली, ज्ञानसाधनांचा वापर, विविध युक्त्यांचा वापर उदा. वादविवाद स्पर्धा, भित्तीपत्रक, चित्रकला, निबंध, वक्तृत्व स्पर्धा, परिसंवाद, अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम उदा - निसर्ग मंडळाची स्थापना, पर्यावरण आपत्ती निवारण प्रशिक्षण, पर्यावरण अभ्यास मंडळाची स्थापना, तज्ज्ञांची व्याख्याने, कार्यशाळा, निसर्गमित्र पुरस्कार, पर्यावरण खेळ, कोडी यांचा वापर, शालेय कार्यक्रमात पालकांचा सहभाग, चर्चा इ.,

**पर्यावरणाच्या शाश्वत विकासासाठी शिक्षकाची भूमिका:**

पर्यावरण शिक्षणात घडणाऱ्या नवीन तांत्रिक समस्या जाणून घेण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी शिक्षकाने पर्यावरण साहित्याचे वाचन, मनन, चिंतन करणे महत्वाचे आहे.

**विद्यार्थी व पर्यावरणाच्या शाश्वत विकासासाठी शिक्षकांची भूमिका**

- पर्यावरण व विद्यार्थी मित्र.
- पर्यावरण विषयाची आवड व विद्यार्थीआदर करणे.
- निसर्गाप्रति व विद्यार्थ्यांप्रति संवेदनशील.
- पर्यावरण शिक्षणाचे ज्ञान व विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचे ज्ञान. (मानसशास्त्र)
- विद्यार्थ्यांचे गुण निरीक्षण क्षमता व पर्यावरण निरीक्षण क्षमता.
- पर्यावरण शिक्षणासाठी व विद्यार्थी विकासासाठी कृतीशील उपक्रमांचे आयोजन. उदा. वृक्षदिंडी, पर्यावरण पोस्टर स्पर्धा इ.
- कार्यक्षम व क्षमाशील शिक्षक.
- उत्तम मार्गदर्शक, सुवाचक.
- पर्यावरण प्रचारक व विद्यार्थी प्रेरक.



P.D. Patil Social Work College College Code 225

Scanned with OKEN Scanner

**निष्कर्ष:**

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडवायचा असेल तर विद्यार्थी व त्यांचे भावविश्व समजून घेणे महत्वाचे आहे. मानव आणि पर्यावरण यांचा आंतरसंबंध अनादिकालापासून आहे. सद्य:स्थिती मध्ये मानवाचा स्व:च्या स्वार्थ्यासाठी पर्यावरणातील हस्तक्षेपामुळे पर्यावरणाची तसेच मानवाचीही अपरिमित हानी होत आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या व पर्यावरणाच्या शाश्वत विकासात शिक्षणाची भूमिका खूप महत्वाची आहे.

**शिफारशी:**

1) प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन व विद्यापीठस्तरावर पर्यावरण जनजागृतीसाठी विविध नवोपक्रम, स्पर्धांचे, कार्यशाळा, परिषदांचे आयोजन करावे.

2) सर्वच स्तरातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण, शाश्वत विकासासाठी शाळा, शिक्षक व पालकांनी जागरुक व सक्रिय रहावे.

3) शासनस्तरावर पर्यावरण व सर्व स्तरातील विद्यार्थी शाश्वत विकासासाठी जास्तीतजास्त नवनवीन योजना कार्यान्वित करून त्यांची अंमलबजावणी करावी. उदा. पोषण आहार, प्रवासभत्ता, शिष्यवृत्ती आरोग्यसेवा इ.

**संदर्भ सूची:**

1) Best, J. W (2007) Research in Education Englewood clifts N. J. prentice Hall 2. Kothari, C. R (2005) Research Methodology New age, International (p) Limited,
2) अहिरराव, अलिझाड, (1995 तृतिय आवृत्ती) पर्यावरण विज्ञान पुणे: निराली प्रकाशन
3) . कुंडले, म. बा. (14 नोव्हे. 2003 दहावी आवृत्ती) शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र पुणेः 6. श्रीविद्या प्रकाशन
4) पवार, ढेरे, पाटील (मार्च 2009) पर्यावरण शिक्षण व अध्यापन पद्धती कोल्हापूर : फडके प्रकाशन
5) राऊत, प्र. द. (2009 दुसरी आवृत्ती) पर्यावरण अभ्यास कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ
6) शिंदे, आनंद (Jan. 2015) शाश्वत विकासासाठी शिक्षण Research Dimensions_Vol 3 Issue – IISSN 2321-5488. Retrieved on 25 Dec 2023
7) डॉ. देसाई प्र. स. (2024). शाश्वत विकासातील शिक्षणाची भूमिका. In Educreator Research Journal: Vol. XI (Number II, pp. 217–224). ERJ. https://doi.org/10.5281/zZenodo.10908049

P.D. Patil Social Work College
College Code 225
AKOLA



Scanned with OKEN Scanner

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

October - 2025

ISSUE No - (DXXX) 530

## Social Work Interventions for Sustainable Development: Opportunities & Challenges






Chief Editor
Dr. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor
Dr. Narhari G. Patil

Editor
Dr. Ambadas Kardile

Jawaharlal Nehru College of Social Work
CIDCO, Nanded, Maharashtra 431603

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Volume C

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DXXX) 530-C

ISSN : 2278-9308 October 2025

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Bridging the Gap: The Critical Role of Social Work in Mitigating Flood Vulnerability and Promoting Sustainable Development in Marathwada, Maharashtra **Dr. Kisan Anna Shingare** | 1 |
| 2 | Role of CSR in Environmental Sustainability **Dr. RaviKumar Ramlu Vidule, Dr. Ashok B. Gawate** | 6 |
| 3 | Usefulness Of Social Work Interventions To Prevent Sickle Cell Disease (Special reference from Nandurbar district at Maharashtra state) **Mr.Nitin W.Tayade. , Prof.Dr.S.I.Kumbhar** | 12 |
| 4 | Environmental Issues, Disaster Management, and Social Work Intervention **Prof.Chetan Ramesh Jadhav.** | 16 |
| 5 | Mental Health System in India and Role of Social Workers in Old Age Population. **Savita B.Chavhan** | 20 |
| 6 | Dystopian Literature and Social Control **More J.G.** | 24 |
| 7 | Sustainable Development through Corporate Social Responsibility, Voluntary Organizations, and Government Partnerships **Asst.Prof.Ashwin B Kakade** | 27 |
| 8 | Role of Social Work Education to increase Democratic Values, Social Justice and Equality. **Asst. Prof.Uddhav S. Bankar** | 31 |
| 9 | सामाजिक बदलातून शाश्वत विकासाकडे : एक अभ्यास डॉ. पूर्णिमा नारायण संधानी | 35 |
| 10 | क्षेत्रकार्य प्रशिक्षणाची शाश्वत विकासाकडे वाटचाल डॉ. चंद्रकांत सुधाकर गांगुर्डे | 42 |
| 11 | शाश्वत विकासासात समाजकार्याची भूमिका गोपाळ हनुमंत बडगिरे | 46 |
| 12 | सामाजिक न्याय, समानता, लोकशाही मुल्य वृद्धीसाठी समाजकार्य शिक्षणाची आवश्यकता प्रा. डॉ.अर्चना नारायण धर्मे | 53 |
| 13 | सामाजिक आणि मानसिक क्षेत्रातील समाजकार्याच्या भूमिका प्रा प्रा. नवनाथ बंकट बडे | 55 |
| 14 | भारतातील शाश्वत विकास ध्येय वस्तुस्थितिचे विश्लेषण चव्हाण उदयराज चंदन | 61 |
| 15 | सामाजिक व मानसिक आरोग्य क्षेत्रातील समाज कार्याची भूमिका श्री.ज्ञानेश्वर बाबुराव सावळे | 66 |
| 16 | हिंगोली जिल्ह्यातील हळद उत्पादन व उत्पन्नाचा अभ्यास विठ्ठल दत्तराव कदम, डॉ.डी.के. मगर | 72 |
| 17 | महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान: समाजकार्य संशोधन, नवोन्मेष व आदर्श | 76 |




P.D. Patil Social Work College College Code 225

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DXXX) 530 -C
ISSN : 2278-9308
October 2025

# सामाजिक न्याय, समानता, लोकशाही मुल्य वृद्धीसाठी समाजकार्य शिक्षणाची आवश्यकता

प्रा. डॉ.अर्चना नारायण थर्मे
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला
archanamahajan57@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतीय समाज विविधतेने नटलेला आहे. धर्म, जात, लिंग, भाषा, प्रादेशिकता यांमुळे समाजात अनेक भेद आहेत. या भेदांमुळे अन्याय, असमानता व वंचितपणाची निर्मिती झाली आहे. अशा परिस्थितीत सामाजिक न्याय, समानता व लोकशाही मुल्यांचा प्रसार होणे हे राष्ट्रीय विकासासाठी अत्यावश्यक आहे. समाजकार्य हे शास्त्र व व्यवसाय समाजातील दुर्बल घटकांच्या विकासासाठी, त्यांना सशक्त करण्यासाठी आणि समाजाला न्याय्य बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. परंतु समाजकार्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी समाजकार्य शिक्षणाची आवश्यकता अनिवार्य ठरते. समाजकार्य शिक्षण विद्यार्थ्यांना सामाजिक समस्यांची सखोल जाणीव करून देतं, मूल्याधिष्ठित दृष्टिकोन विकसित करतं आणि लोकशाहीच्या पायावर आधारित सेवाभाव निर्माण करतं.

**समाजकार्य शिक्षणाची संकल्पना व इतिहास :**

समाजकार्य ही मानवी गरजांवर आधारित व्यावसायिक सेवा आहे. यात व्यक्ती, कुटुंब, गट, समाज तसेच संस्थांसोबत कार्य करून त्यांना सामाजिक, आर्थिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनवण्यावर भर दिला जातो. समाजकार्य शिक्षण म्हणजे या व्यावसायिक कार्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, सैद्धांतिक ज्ञान, संशोधन क्षमता व नैतिकता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे होय.

भारतामध्ये समाजकार्य शिक्षणाचा प्रारंभ विसाव्या शतकाच्या सुरुवातीला झाला. १९३६ मध्ये मुंबईत टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS) ही संस्था स्थापन झाली आणि त्यानंतर समाजकार्य शिक्षणाचा पाया अधिक भक्कम झाला. स्वातंत्र्यानंतर संविधानाने सामाजिक न्याय व समानतेची हमी दिल्यामुळे समाजकार्य शिक्षणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. आज भारतातील जवळपास प्रत्येक विद्यापीठात समाजकार्य विषय उपलब्ध आहे.

**सामाजिक न्यायाची आवश्यकता :**

सामाजिक न्याय म्हणजे समाजातील सर्व घटकांना न्याय्य संधी, समान वागणूक व विकासासाठी आवश्यक साधने उपलब्ध होणे. भारतीय समाजात जातीभेद, आर्थिक विषमता, लिंग असमानता, दलित-आदिवासींचे शोषण, अल्पसंख्याकांचे प्रश्न, अपंग व वृद्धांची उपेक्षा या समस्या आजही दिसून येतात. या समस्या दूर करण्यासाठी समाजकार्य शिक्षण विद्यार्थ्यांना अन्याय व भेदभावाविरुद्ध लढण्यासाठी सज्ज करतं. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला व्यावहारिक रूप देण्यासाठी समाजकार्य शिक्षण हे प्रभावी साधन ठरतं.

**समानतेची गरज :**

भारतीय संविधानाने सर्वांना समानतेचा अधिकार दिला असला तरी व्यवहारात असमानता सर्वत्र आहे. ग्रामीण व शहरी भागातील दरी, स्त्री-पुरुष असमानता, शिक्षण-आरोग्याच्या संधींतील तफावत, श्रीमंत-गरीब अंतर या समस्या मोठ्या प्रमाणावर जाणवतात. समाजकार्य शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता वाढते, समान संधी निर्माण करण्यासाठी धोरणात्मक दृष्टिकोन विकसित होतो आणि सामाजिक सेवा क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा मिळते.

**लोकशाही मूल्यांची उभारणी व समाजकार्य :**

लोकशाही म्हणजे फक्त निवडणूक प्रक्रिया नसून ती जीवनपद्धती आहे. समानता, बंधुता, स्वातंत्र्य, न्याय या मूल्यांवर लोकशाही उभारलेली आहे. परंतु आज लोकशाहीला जातीयता, प्रादेशिकता, राजकीय हिंसा व भ्रष्टाचार यांसारखी आव्हाने आहेत. लोकशाही टिकवण्यासाठी लोकशाही मूल्यांचा प्रसार आवश्यक आहे. समाजकार्य शिक्षण विद्यार्थ्यांना लोकशाही पद्धतीने समस्या सोडवायला शिकवतं, सामाजिक सहभाग वाढवतं व नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करतं.

**समाजकार्य शिक्षणाची भूमिका :**



Patil Social Work College
College Code 225
AKOLA

समाजकार्य शिक्षण केवळ रोजगाराचे साधन नसून ते समाजाच्या परिवर्तनाचे माध्यम आहे. हे शिक्षण विद्यार्थ्यांमध्ये मानवी अधिकारांविषयी जागरूकता निर्माण करतं.
समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक कौशल्य व दृष्टीकोन विकसित करतं.
समाजकार्यकर्त्यांना व्यावसायिक पद्धतीने सामाजिक प्रश्न हाताळण्याचे प्रशिक्षण मिळतं.
लोकशाही व सामाजिक न्याय यांची सांगड घालून सर्वसमावेशक विकासाची संधी उपलब्ध करून देतं.

भारतीय संदर्भातील समाजकार्य शिक्षण :

भारतातील समाजकार्य शिक्षण हे भारतीय परिस्थितीशी निगडीत आहे. ग्रामीण भागातील गरीबी, बेरोजगारी, महिला व बालकांचे प्रश्न, आरोग्य समस्या, व्यसनाधीनता, शहरी भागातील झोपडपट्ट्या, स्थलांतर, पर्यावरणीय प्रश्न अशा विविध समस्या भारतीय समाजात आहेत. समाजकार्य शिक्षण या समस्या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवतं. तसेच क्षेत्रीय कार्य, प्रशिक्षण शिबिरे, संशोधन प्रकल्प, स्वयंसेवी संस्थांशी जोडलेले अनुभव यांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सामाजिक परिस्थिती समजते.

आधुनिक आव्हाने व संधी :

आजच्या काळात समाजकार्य शिक्षणासमोर अनेक आव्हाने आहेत.

* जागतिकीकरणामुळे वाढणारी आर्थिक विषमता
* तंत्रज्ञानामुळे उद्भवणारे नवे सामाजिक प्रश्न
* बेरोजगारी, स्थलांतर, मानसिक ताण
* पर्यावरणीय संकटे

या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी समाजकार्य शिक्षणाचे स्वरूप बदलत आहे. डिजिटल पद्धतीने शिक्षण, ई-गव्हर्नन्स, CSR उपक्रम, शाश्वत विकास या नव्या दिशांमध्ये समाजकार्याला संधी उपलब्ध होत आहेत.

निष्कर्ष :

समाजकार्य शिक्षण हे फक्त व्यावसायिक प्रशिक्षण नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. सामाजिक न्याय, समानता व लोकशाही मूल्य वृद्धीसाठी समाजकार्य शिक्षणाची आवश्यकता अत्यंत महत्त्वाची आहे. हे शिक्षण विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, संवेदनशीलता व सामाजिक बांधिलकी निर्माण करतं. समाजातील दुर्बल घटकांचा विकास, असमानतेचे निर्मूलन, लोकशाही प्रक्रियेत सहभाग आणि सर्वसमावेशक विकास या दृष्टीने समाजकार्य शिक्षणाचे योगदान अतिशय मौल्यवान आहे.

संदर्भ :

1) जातिभेद सामाजिक न्याय व समानते वरील मूलभूत ग्रंथ, डॉ. बी आर आंबेडकर
2) समाजकार्य शिक्षण व सामाजिक न्याय, एम एस गोरे
3) सामाजिक धोरणे व न्याय, एस एन दुबे

Smt. P.D. Patil Social Work College, Khadki [illegible]
College Code 225



Scanned with OKEN Scanner

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

October - 2025

ISSUE No - (DXXX) 530

## Social Work Interventions for Sustainable Development: Opportunities & Challenges






**Chief Editor**
Dr.Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. Narhari G. Patil

**Editor**
Dr. Ambadas Kardile

Jawaharlal Nehru College of Social Work
CIDCO, Nanded, Maharashtra 431603

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Volume C

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

P.D. Patil Social Work College
College Code
225

Scanned with OKEN Scanner

Impact Factor - (SJIF) - [illegible] ISSN - 2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal

## October - 2025

ISSUE No - [illegible]

Social Work Interventions for

Sustainable Development: Opportunities & Challenges

Prof. Virag S. Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati

Dr. [illegible]
Executive Editor
[illegible] College of Social Work
[illegible]

Dr. [illegible]
Editor
[illegible] College of Social Work
[illegible]

## Aadhar International Publication

For Details Visit To : [illegible]

© All rights reserved with the authors & publisher

ISSN : 2278-9308
October 2025



## शुभेच्छा संदेश

श्री. सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड संचलित जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, नांदेड आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) यांच्या संयुक्त विद्यमाने "शाश्वत विकासासाठी समाज कार्य हस्तक्षेप : संधी व आव्हाने" या विषयावर दि. 07 ऑक्टोबर 2025 रोजी राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजित करीत असल्याबाबत मला मनस्वी आनंद होत आहे.

संयुक्त राष्ट्राने 2030 पर्यंत साध्य करावयाची 17 शाश्वत विकास उद्दिष्टे स्विकारलेली आहेत. ही शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यामध्ये समाजकार्य शिक्षण महत्वपूर्ण आहे. कारण समाजकार्य हा फक्त सेवाभाव नसून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग आहे. ग्रामीण विकास, महिला व बालकल्याण, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संवर्धन या सर्व क्षेत्रांत समाजकार्यकर्त्यांची सक्रिय भूमिका ही शाश्वत विकासाची किल्ली ठरू शकते.

सदरील चर्चासत्रामध्ये महाराष्ट्र राज्यातील विविध भागातून सहभागी होणारे सर्व प्राचार्य, संसाधन व्यक्ती, प्राध्यापक, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, संशोधक व विद्यार्थी या सर्वांचे संस्थेच्या वतीने मन:पूर्वक हार्दिक स्वागत करतो.

चर्चासत्र यशस्वीतेसाठी मन:पूर्वक शुभेच्छा ...!

कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव
संस्थापक अध्यक्ष,
श्री. सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | प्रथेतून शाश्वत विकास उद्दिष्टांची पूर्तता — जाधव विठ्ठल रामनाथ | |
| 18 | समाजकार्य शिक्षणाच्या अभ्यासक्रम आणि क्षेत्र कार्यातील आव्हाने: मराठवाडा विभागाचा सखोल अभ्यास — ओंकार बसलिंग मठपती | 79 |
| 19 | सामाजिक कार्यकर्त्यांच्या कौशल्य वृद्धीत माहिती तंत्रज्ञान व डिजिटल संसाधनांचे योगदान — डॉ. योगेश विश्वनाथ अंबुलगेकर | 86 |
| 20 | प्रकल्पग्रस्त विस्थापितांचे पुनर्वसन आणि समाजकार्य हस्तक्षेप: एक अभ्यास — हळदे दत्तात्रय संभाजीराव | 89 |
| 21 | सुदृढ सामाजिक व मानसिक आरोग्यात समाजकार्याचे विविध पैलू — डॉ. केशव आलगुले | 99 |
| 22 | भावनिक बुद्धिमत्ता आणि व्यावसायिक यश — डॉ. दिनेश ढेंगळे | 102 |
| 23 | शाश्वत विकासासाठी मुलभूत विज्ञानातील आव्हाने: एक विश्लेषणात्मक अभ्यास — श्री. सुधाकर उत्तमराव राठोड | 104 |
| 24 | महिला सरपंच व शाश्वत लोकशाही शासनः सामाजिक न्याय आणि ग्रामीण विकासाचा समतोल — शुभांगी प्रभाकर जावळे | 108 |
| 25 | बालकामगार एक सामाजिक समस्या व समाज कार्यकर्त्यांची भूमिका — डॉ. केतन गौतम वाकोडे, | 113 |
| 26 | ग्रामीण महिलांच्या घरावरील उज्वला गॅस योजनेचा सामाजिक-आर्थिक परिणाम — अनुजा अशोकराव कांडलीकर | 115 |
| 27 | महिला सक्षमीकरण :- भारतीय महिलांचा पुढाकार आणि जागतिक प्रभाव — उषा मनोहर काटे | 121 |
| 28 | बांधकाम क्षेत्रातील महिलाकामगारांच्यासामाजिकसमस्या आणि उपाययोजना — व्यंकटेश अशोक हंगरगे , डॉ. दिनेश शिवाजी मौने | 125 |
| 29 | लैंगीक समानता महिला सक्षमीकरणः समाजकार्य दृष्टीकोन — डॉ. प्रविण कोहळे | 130 |
| 30 | ग्रंथालयातील डिजिटल प्रणालींचा उपयोग: उपभोक्ता सहभाग व समाजकार्य शिक्षणातील हस्तक्षेप — श्री. रामदास निळकंठ काळे, डॉ. बोबडे ए. आर | 133 |
| 31 | सामाजिक जागरूकता में हिंदी भाषा का योगदान — डॉ. बालाजी महाळंकर | 137 |
| 32 | मराठी स्त्रीवादी साहित्यातील स्त्री-सक्षमीकरणाची बदलती संकल्पना आणि समाजकार्याची भूमिका — प्रा. संजीवकुमार श्रीमंतराव माने | 141 |
| 33 | लैंगिक समानता एवं महिला सक्षमीकरण के संदर्भ में समकालीन हिंदी कहानियों का | 147 |




Social Work College
College Code

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (DXXX) 530 -C
ISSN : 2278-9308
October 2025

# बालकामगार एक सामाजिक समस्या व समाज कार्यकर्त्यांची भूमिका

डॉ. केतन गौतम वाकोडे,
(सहाय्यक प्राध्यापक)
मोबाईल नं.-9960467197 ई-मेल आयडी- ketanwakode@gmail.com
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला

बालकामगार ही भारतातील एक गंभीर सामाजिक समस्या आहे. शिक्षणाचा अभाव, गरिबी, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, तसेच सामाजिक असमानता या कारणांमुळे अनेक बालकं आपल्या बालपणाचा आनंद गमावून मजुरीच्या कामात गुंततात. बालकाम हे केवळ त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाला बाधक ठरत नाही, तर समाजाच्या नैतिक मूल्यांनाही धक्का पोहोचवते.

भारतातील समाजरचनेत बालकाला देवाचा अवतार मानले जाते. परंतु वास्तवात अनेक मुले आपल्या बालपणापासूनच श्रमाच्या जंजीरात अडकलेली दिसतात. "बालकामगार" ही केवळ आर्थिक नाही तर सामाजिक, नैतिक आणि मानवी हक्कांशी निगडित गंभीर समस्या आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासात बालकांचे बालपण व शिक्षण महत्त्वाचे घटक आहेत. त्यामुळे बालकामगार निर्मूलन हे सामाजिक कार्यकर्त्यांचे एक महत्त्वाचे कर्तव्य ठरते.

**बालकामगाराची संकल्पना**

बालकामगार म्हणजे असे बालक (साधारणतः १४ वर्षाखालील मुले) जे आपले बालपण गमावून मजुरीच्या कामात गुंतलेले असतात. ही मुले शाळेत जाण्याऐवजी काम करून उपजीविका करतात. हे काम अनेकदा शारीरिक, मानसिक व भावनिक दृष्ट्या त्रासदायक असते.

भारतात "बालकामगार प्रतिबंध व विनियमन अधिनियम, 1986" नुसार १४ वर्षाखालील मुलांना धोकादायक उद्योगांमध्ये कामावर ठेवणे गुन्हा मानला आहे.

अठराव्या शतकापूर्वी सर्व देशांत शेती हा लहान प्रमाणावरील किंवा कौटुंबिक असा सार्वत्रिक व्यवसाय असे. शेतकऱ्यांच्या गरजा भागविण्याकरता खेड्यातील लोक शेतीला पूरक असे इतर उद्योग करीत असत, शेतीत व या पूरक उद्योगात मुलांना कामाला लावले जाई. कुटुुंबातील मुले उद्योगाचे शिक्षण घेत; परंतु त्यामुळे त्यांचे शालेय शिक्षण होत नसे व त्या कौटुंबिक व्यवसायात त्यांची पिळवणूक होई.

औद्योगिक क्रांतीच्या प्रारंभापासून या समस्येचा उगम झाला, त्याला कारणही तसेच घडले. १७६० नंतर प्रथम इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणात कुळांना शेतावरून हाकलून दिले गेले. त्यामुळे अर्थातच ती हजारो कुटुंबे बेघर झाली. याच सुमारास इंग्लंडमध्ये निरनिराळ्या उद्योगांचे कारखाने उभे राहिले व बेकारांना काम मिळाले. मिळालेल्या मजुरीवर काम करण्याची, तेही अठरा-अठरा तास, वेळ आली. कुटुंबाचे उत्पन्न कमी, त्यामुळे मुलांना कामाला लावले जाऊ लागले.बालकामगार समस्येची सुरुवात येथूनच झाली. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात चहा, कॉफी, रबर इ. मळ्यांच्या व्यवसायात अगदी लहान वयापासून मुले काम करीत. याविषयी कायदा करण्यात आला व बारा वर्षाखालील मुलाना कामगार म्हणून न घेण्याची तरतूद केली गेली. खाणीविषयीच्या कायद्यात १२ वर्षाखालील मुलाना काम देऊ नये असे बंधन घालण्यात आले. ही मर्यादा १९३५ च्या कायद्याने १५ वर्ष केली व तिची अंमलबजावणी सर्तर होत आहे.

आज ही फटाके तयार करण्यासाठी, सतरंज्या विणणे, हाटेलमध्ये वेटर अशी कामे मुलांना दिली जात आहेत. जरीचे भरतकाम, सोनारकाम यासाठीही या मुलांचा उपयोग करून घेतला जातो. असंघटित उद्योगात लहान मुलांना काम दिले जाते.मुले जेथे काम करतात, तिथली परिस्थिती फारशी चांगली नसते, कारखान्यात, हॉटेलच्या भटारखान्यात काम करणाऱ्या मुलाना कोंदट जसं शक्य नसते. महाराष्ट्रात परराज्यांतून आलेल्यामुलांची तर अतिशय पिळवणूक केली जाते.



P.D. Patil Social Work College
College Code
225

बालकामगाराची व्याख्या

बालकामगार म्हणजे — १४ वर्षांखालील मुलांमार्फत कोणत्याही प्रकारचे शारीरिक अथवा मानसिक श्रम करून घेणे, जे त्यांच्या आरोग्य, शिक्षण व सर्वांगीण विकासास अपायकारक ठरते.

बालकामगाराचे परिणाम

1. शारीरिक हानी: आरोग्य बिघडते, पोषणाचा अभाव.
2. मानसिक हानी: भय, असुरक्षितता, आत्मविश्वासाचा अभाव.
3. शैक्षणिक मागासलेपण: शिक्षण थांबते, भविष्य अंधारात जाते.
4. सामाजिक अन्याय: मुलांना वंचित वर्गात ढकलले जाते.
5. आर्थिक चक्र कायम राहते: गरीब पिढ्या गरीबच राहतात.

कायदे आणि सरकारी उपाय

1. बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम, 1986
2. काही उद्योगांमध्ये बालकामावर बंदी.
3. बालहक्क कायदा (2005)
4. बालकांना शोषण, अत्याचार, आणि दुर्लक्षापासून संरक्षण.

मोफत व सक्तीचे शिक्षण कायदा, 2009 (RTE Act)

5. 6 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत शिक्षणाचा हक्क.
6. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प (NCLP):
   बालकामगारांना मुक्त करून शिक्षण व कौशल्य प्रशिक्षण देणे.

समाजकार्यकर्त्याची भूमिका

समाजकार्यकर्ता या समस्येत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो.

जागृती निर्माण करणे:

– पालक, शाळा व समाजात बालकामाचे दुष्परिणाम समजावणे.

शिक्षणाकडे पुनर्वसन:

– काम करणाऱ्या मुलांना शिक्षण प्रणालीत परत आणणे.

सरकारी योजनांबद्दल माहिती देणे:

– पालकांना शिष्यवृत्ती, मोफत शिक्षण, बालसंरक्षण योजना सांगणे.

संशोधन व धोरणनिर्मिती:

– क्षेत्रीय अभ्यास करून सरकारला योग्य सूचना देणे.

एनजीओंसह सहकार्य:

– 'चाइल्ड लाईन', 'सेव्ह द चिल्ड्रन', 'CRY' अशा संस्थांबरोबर काम करणे.

कायद्याची अंमलबजावणी:

– बालकामगार विरोधी कायद्यांचे पालन व्हावे यासाठी स्थानिक प्रशासनासोबत काम करणे.

कौटुंबिक सक्षमीकरण:

– पालकांना स्वावलंबी करण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण देणे.

निष्कर्ष

बालकामगार ही केवळ आर्थिक नव्हे तर नैतिक व सामाजिक समस्या आहे. समाजकार्यकर्त्यांनी समाज, सरकार आणि स्वयंसेवी संस्था यांच्यात समन्वय साधून बालकांना त्यांच्या हक्काचे बालपण, शिक्षण आणि सुरक्षित भविष्य देणे हेच खरे समाजकार्य होय.



Smt. P.D. Patil Social Work College, College Code 225, Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

October - 2025

ISSUE No - (DXXX) 530

## Social Work Interventions for Sustainable Development: Opportunities & Challenges






Chief Editor
Dr. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor
Dr. Narhari G. Patil

Editor
Dr. Ambadas Kardile

Jawaharlal Nehru College of Social Work
CIDCO, Nanded, Maharashtra 431603

Volume C

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Smt. P.D. Patil Social Work ... College Code 225

Scanned with OKEN Scanner

## INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Bridging the Gap: The Critical Role of Social Work in Mitigating Flood Vulnerability and Promoting Sustainable Development in Marathwada, Maharashtra | Dr. Kisan Anna Shingare | 1 |
| 2 | Role of CSR in Environmental Sustainability | Dr. RaviKumar Ramlu Vidule, Dr. Ashok B. Gawate | 6 |
| 3 | Usefulness Of Social Work Interventions To Prevent Sickle Cell Disease (Special reference from Nandurbar district at Maharashtra state) | Mr.Nitin W.Tayade. , Prof.Dr.S.I.Kumbhar | 12 |
| 4 | Environmental Issues, Disaster Management, and Social Work Intervention | Prof.Chetan Ramesh Jadhav. | 16 |
| 5 | Mental Health System in India and Role of Social Workers in Old Age Population. | Savita B.Chavhan | 20 |
| 6 | Dystopian Literature and Social Control | More J.G. | 24 |
| 7 | Sustainable Development through Corporate Social Responsibility, Voluntary Organizations, and Government Partnerships | Asst.Prof.Ashwin B Kakade | 27 |
| 8 | Role of Social Work Education to increase Democratic Values, Social Justice and Equality. | Asst. Prof.Uddhav S. Bankar | 31 |
| 9 | सामाजिक बदलातून शाश्वत विकासाकडे : एक अभ्यास | डॉ. पूर्णिमा नारायण मंधानी | 35 |
| 10 | क्षेत्रकार्य प्रशिक्षणाची शाश्वत विकासाकडे वाटचाल | डॉ. चंद्रकांत सुधाकर गांगुर्डे | 42 |
| 11 | शाश्वत विकासामात समाजकार्याची भूमिका | गोपाळ हनुमंत बडगिरे | 46 |
| 12 | सामाजिक न्याय, समानता, लोकशाही मुल्य वृद्धीसाठी समाजकार्य शिक्षणाची आवश्यकता | प्रा. डॉ.अर्चना नारायण धर्मे | 53 |
| 13 | सामाजिक आणि मानसिक क्षेत्रातील समाजकार्याच्या भूमिका | प्रा प्रा. नवनाथ बंकट बडे | 55 |
| 14 | भारतातील शाश्वत विकास ध्येय वस्तुस्थितिचे विश्लेषण | चव्हाण उदयराज चंदन | 61 |
| 15 | सामाजिक व मानसिक आरोग्य क्षेत्रातील समाज कार्याची भूमिका | श्री.ज्ञानेश्वर बाबुराव साबळे | 66 |
| 16 | हिंगोली जिल्ह्यातील हळद उत्पादन व उत्पन्नाचा अभ्यास | विठ्ठल दत्तराव कदम, डॉ.डी.के. मगर | 72 |
| 17 | महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान: समाजकार्य संशोधन, नवोन्मेष व आदर्श | | 76 |





Smt. P.D. Patil Social Work College, College Code 225

Scanned with OKEN Scanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO. (DXXX) 530 -C
ISSN : 2278-9308 October 2025

# सामाजिक आणि मानसिक क्षेत्रातील समाजकार्याच्या भूमिका

प्रा प्रा. नवनाथ बंकट बडे
( सहाय्यक प्राध्यापक )
मोबाईल नं. 9850130221 ईमेल - badenb11@gmail.com
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला

**प्रस्तावना :**

मानव हा सामाजिक प्राणी आहे. तो समाजाशिवाय जगू शकत नाही. प्रत्येक व्यक्तीचे जीवन समाजाच्या चौकटीत, कुटुंब, गट, संस्था आणि विविध सामाजिक प्रणालींमध्ये घडत असते. या प्रक्रियेत त्याला सामाजिक तसेच मानसिक समस्या उद्भवतात. समाजकार्य ही अशी व्यावसायिक सेवा आहे जी व्यक्ती, कुटुंब, गट आणि समाजाला त्यांच्या अडचणींवर मात करण्यासाठी मदत करते आणि त्यांना सक्षम बनवते. समाजकार्याचे कार्यक्षेत्र खूप व्यापक असून त्यामध्ये सामाजिक तसेच मानसिक क्षेत्रातील कार्य विशेष महत्त्वाचे मानले जाते. सामाजिक कार्यकर्ता केवळ समस्यांचे निराकरण करणारा नसून तो एक मार्गदर्शक, सहाय्यक, सल्लागार आणि परिवर्तनाचा वाहक असतो.

समाजकार्याच्या अभ्यासक्रमात सामाजिक व मानसिक क्षेत्रातील कार्याला विशेष प्राधान्य दिले जाते कारण दोन्ही क्षेत्र एकमेकांशी निगडित आहेत. समाजातील असमानता, गरीबी, शोषण, बेरोजगारी यांसारख्या सामाजिक समस्या मानसिक ताणतणाव निर्माण करतात, तर मानसिक असंतुलनामुळे व्यक्ती स्वतःच्या आयुष्यात आणि समाजात योग्य रीतीने कार्य करू शकत नाही. या दोन्ही समस्यांना हाताळणे हे समाजकार्याचे मुख्य ध्येय होय.

**समाजकार्याची संकल्पना आणि उद्दिष्टे :**

समाजकार्य म्हणजे व्यावसायिक पद्धतीने व्यक्ती, गट, कुटुंब व समाजाशी संवाद साधून त्यांना त्यांच्या समस्यांवर मात करण्यासाठी मदत करणे, त्यांची क्षमता विकसित करणे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे. समाजकार्याची मुख्य उद्दिष्टे म्हणजे सामाजिक न्याय, समान संधी, समानता, मानवी हक्कांचा आदर, व्यक्तिमत्त्व विकास. आत्मनिर्भर आणि समाजातील दुर्बल घटकांना सशक्त करणे.

**संशोधनचा उद्देश :**

1. सामाजिक आणि मानसिक क्षेत्रातील समाज कार्यकर्त्यांची कार्यप्रणाली समजून घेणे.
2. मानसिक आजार असलेल्या व्यक्तींना समाजात पुनःस्थापन करण्यासाठीच्या प्रयत्नांचे विश्लेषण करणे.
3. समाजात मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यातील समाज कार्यकर्त्यांची भूमिका तपासणे.
4. सामाजिक समस्यांशी संबंधित मानसिक त्रास आणि त्या संदर्भातील उपाययोजना शोधणे.

**संशोधन अध्ययन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन पत्रिकेत द्वितीय स्त्रोतांचा उपयोग करण्यात आलेला असून त्यात प्रामुख्याने निरीक्षण पुस्तके मासिके लेख इंटरनेट आणि नियतकालिके यांचा संदर्भात घेण्यात आलेला आहे या आधारे संबंधित विषयांचे मांडणी करण्यात आलेले आहे

**सामाजिक क्षेत्रातील समाजकार्य:**

सामाजिक क्षेत्र म्हणजे समाजात निर्माण होणाऱ्या समस्या, अडचणी, संघर्ष आणि त्यावरील उपाययोजना. यात गरीबी, बेरोजगारी, जातीयता, लिंगभेद, बालमजुरी, व्यसनाधीनता, महिलांवरील अत्याचार, वृद्धांची उपेक्षा, अपंगांचे प्रश्न, स्थलांतर, शहरीकरण, पर्यावरणीय संकटे इत्यादींचा समावेश होतो. समाजकार्य या सर्व समस्यांवर विविध समाजकार्याच्या पद्धती, तंत्रे, कौशल्य आणि तत्त्वज्ञान यांच्या साह्याने कार्य करते.

१) गरीबी निर्मूलन :



Smt. P.D. Patil Social Work College College Code 225 AKOLA

Scanned with OKEN Scanner

ISSN : 2278-9308
October 2025

गरिबी ही भारतातील सर्वात मोठी सामाजिक समस्या आहे. गरीब व्यक्तींना अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षणाच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत. समाजकार्यकर्ते स्वयंसेवी संस्थांमार्फत गरीब कुटुंबांना शासकीय योजनांची माहिती देतात, स्वयंसाहाय्य गट तयार करतात, रोजगाराभिमुख प्रशिक्षण आयोजित करतात आणि समुदाय विकास कार्यक्रम राबवतात. या सर्व साधनांच्या आधारे समाजकार्य समाजाचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि उंचावण्यासाठी कार्य करते.

२) बेरोजगारी :

बेरोजगारी म्हणजे काय ज्या स्थितीत काम करण्याची इच्छा आणि क्षमता असूनही व्यक्तीला रोजगार मिळत नाही, त्या स्थितीला बेरोजगारी (Unemployment) असे म्हणतात. बेरोजगारीमुळे तरुणांमध्ये निराशा, व्यसनाधीनता व गुन्हेगारी वाढते. समाजकार्यकर्ते कौशल्य विकास कार्यक्रम, करिअर मार्गदर्शन, लघुउद्योग प्रशिक्षण यांद्वारे बेरोजगारांना सक्षम आणि आर्थिक दृष्टिकोनातून स्वावलंबी बनवतात.

३) महिला सक्षमीकरण :

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना त्यांच्या जीवनातील निर्णय स्वयंपूर्णपणे घेण्याची, सामाजिक-आर्थिक व राजकीय क्षेत्रात समान सहभाग घेण्याची क्षमता प्राप्त करून देणे. याचा उद्देश म्हणजे — समानता, आत्मविश्वास आणि स्वावलंबन निर्माण करणे. महिलांवर होणारे अत्याचार, बालविवाह, हुंडा प्रथा, लैंगिक छळ या समस्या आजही विद्यमान आहेत. NGO, सरकारी संस्था व समाजकार्य विभागांच्या माध्यमातून महिला कल्याण कार्यक्रम राबविणे. समाजकार्यकर्ते महिला बचत गट, आत्मसुरक्षा प्रशिक्षण, आरोग्य शिबिरे व कायदेशीर सल्ला यांद्वारे महिलांचे सक्षमीकरण करतात.

४) बालकांचे प्रश्न :

बालक हे कोणत्याही समाजाचे भविष्य असतात. परंतु अनेक बालक गरिबी, अशिक्षण, अत्याचार, बालमजुरी, आरोग्य समस्या. बालमजुरी, बालविवाह, निरक्षरता, पोषणाचा अभाव अशा अनेक अडचणींना सामोरे जातात. व्यावसायिक समाजकार्य (Professional Social Work) या समस्या ओळखून संरक्षण, पुनर्वसन आणि विकासात्मक दृष्टिकोनातून कार्य करते. अंगणवाडी केंद्रे, शाळा व बालकल्याण संस्था या ठिकाणांच्या माध्यमातून कार्य करतात. मुलांना शिक्षण, आरोग्य सेवा व संरक्षण मिळवून देण्यासाठी व्यावसायिक समाजकार्य प्रयत्न करते.

५) वृद्धांचे प्रश्न :

वृद्ध म्हणजे 60 वर्षांवरील व्यक्ती. आधुनिक समाजरचनेमुळे संयुक्त कुटुंबांची विघटन, औद्योगिकीकरण, स्थलांतर, आणि जीवनशैलीतील बदल यामुळे वृद्धांना सामाजिक, आर्थिक आणि मानसिक समस्या भेडसावतात. व्यावसायिक समाजकार्य या समस्यांकडे संवेदनशील, पुनर्वसनात्मक आणि सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून पाहते. वृद्धापकाळात सामाजिक एकाकीपणा, आर्थिक असुरक्षितता, आरोग्य समस्या, मानसिक समस्या, घरगुती अत्याचार व दुर्लक्ष, कायदेशीर व सामाजिक संरक्षणाचा अभाव जास्त जाणवतात. समाजकार्यकर्ते वृद्धाश्रम, दिवस देखभाल केंद्रे, आरोग्य तपासणी शिबिरे, समुपदेशन, पुनर्वसनात्मक भूमिका (Rehabilitative Role), विकासात्मक भूमिका, सेवा पुरवून वृद्धांना मानसिक आधार देतात.

व्यावसायिक समाजकार्य वृद्धांना आदर, सन्मान आणि आत्मनिर्भर जीवन देण्यावर भर देते. समाजकार्याचे मूल्य — सेवा, सामाजिक न्याय, मानवी सन्मान आणि सहभाग — यांच्या आधारे समाजकार्यकर्ता वृद्धांच्या समस्या समजून घेऊन, त्यांचे पुनर्वसन आणि सक्षमीकरण घडवतो

६) अपंगांचे प्रश्न :

"दिव्यांग" म्हणजे अशी व्यक्ती ज्यांना शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा संवेदनक्षम अडचणींमुळे दैनंदिन जीवनात मर्यादा येतात. भारतीय कायद्यानुसार (अपंग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, 2016) 21 प्रकारचे अपंगत्व मान्य आहेत. व्यावसायिक समाजकार्य या समस्यांकडे मानवी हक्क, समान संधी आणि सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून पाहते. अपंग व्यक्तींना समाजात अजूनही दुय्यम वागणूक दिली जाते. समाजकार्यकर्ते अपंगांच्या शिक्षण, रोजगार,



D. Patil Social Work Colle
Code
Scanned with OKEN Scanner

आरोग्य, सामाजिक भेदभाव, वाहतूक व वास्तू अडथळे, आणि पुनर्वसनासाठी प्रयत्न करतात. विशेष शाळा, कौशल्य प्रशिक्षण केंद्रे व शासकीय योजनांशी जोडून त्यांना सक्षम बनवतात.

व्यावसायिक समाजकार्य- संरक्षणात्मक भूमिका, दिव्यांगांच्या हक्कांबाबत जागृती करणे. "अपंग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, 2016" व "राष्ट्रीय दिव्यांग धोरण, 2006" यांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे. उपचारात्मक भूमिका. (Therapeutic Role) समुपदेशन, (Counselling) द्वारे मानसिक आधार देणे, कुटुंबीयांमध्ये स्वीकारभाव निर्माण करणे. पुनर्वसनात्मक भूमिका (Rehabilitative Role) शिक्षण, रोजगार व सामाजिक पुनर्स्थापनेचे प्रयत्न. व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रे व विशेष शाळांशी समन्वय. विकासात्मक भूमिका (Developmental Role) दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगार, कौशल्य प्रशिक्षण देणे. SHG (Self Help Group), NGO आणि शासन योजनांद्वारे सक्षमीकरण. धोरणात्मक व प्रचारात्मक भूमिका (Advocacy & Policy Role) दिव्यांगांसाठी अनुकूल पायाभूत सुविधा, शिक्षण व आरक्षण धोरणांबाबत शासनाकडे मागण्या. समाजात दिव्यांगांविषयी सकारात्मक दृष्टीकोन विकसित करणे.

महत्त्वाच्या योजना व कायदे- अपंग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, 2016 दिव्यांगांच्या अधिकारांचे संरक्षण व समान संधी, राष्ट्रीय दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ (NHFDC) आर्थिक सहाय्य व उद्यमशीलतेसाठी कर्ज योजना, सुगम भारत अभियान (Accessible India Campaign) सार्वजनिक ठिकाणे व वाहतूक दिव्यांगसुलभ करणे, दीनदयाळ अपंग पुनर्वसन योजना (DDRS) पुनर्वसन व संस्थात्मक सहाय्य, नॅशनल हॅंडिकॅप्ड एम्प्लॉयमेंट स्कीम, दिव्यांगांना रोजगार व प्रशिक्षण संधी

व्यावसायिक समाजकार्य दिव्यांग व्यक्तींकडे दयाभावाने नव्हे तर समानतेच्या आणि सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून पाहते. समाजकार्याचे मूल्य — मानवी सन्मान, सामाजिक न्याय, सेवा व सहभाग — यांच्या आधारे दिव्यांगांना समाजात स्वावलंबी आणि आदराचे स्थान मिळवून देणे हेच खरे उद्दिष्ट आहे.

**मानसिक क्षेत्रातील समाजकार्य :**

मानसिक समाजकार्य (Psychiatric Social Work) ही समाजकार्याची एक विशेष शाखा आहे जी मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींच्या उपचार, पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्स्थापनेवर लक्ष केंद्रित करते. यामध्ये समाजकार्यकर्ता वैद्यकीय, मानसशास्त्रीय आणि सामाजिक दृष्टिकोन वापरून रुग्ण, त्याचे कुटुंब आणि समाज यांच्यातील नातेसंबंध सुधारण्याचे कार्य करतो. मानसिक आरोग्य हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी तितकेच आवश्यक आहे जितके शारीरिक आरोग्य. तणाव, नैराश्य, व्यसनाधीनता, आत्महत्येची प्रवृत्ती, कौटुंबिक ताणतणाव, व्यक्तिमत्त्व समस्या या मानसिक समस्या आज प्रचंड वाढल्या आहेत. आधुनिक जीवनशैली, स्पर्धा, बेरोजगारी, शहरीकरण यामुळे मानसिक ताण वाढतो आहे.

१) समुपदेशन (Counselling) :

समुपदेशन (Counselling) म्हणजे एखाद्या व्यक्तीला त्याच्या भावनिक, मानसिक किंवा सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी मार्गदर्शन आणि आधार देणे. हे एक सहकार्यात्मक आणि विश्वासावर आधारित नातं (Helping Relationship) असते — ज्यात समाजकार्यकर्ता क्लायंटला स्वतःचे विचार, भावना आणि निर्णय स्पष्टपणे समजून घेण्यास मदत करतो. समाजकार्यकर्ते शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, उद्योगसंस्था आणि सामाजिक संस्था येथे समुपदेशन सेवा देतात. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक ताण, युवकांचे करिअर निवड प्रश्न, कौटुंबिक व वैवाहिक तणाव, व्यसनमुक्ती यासंबंधी मार्गदर्शन करतात.

व्यावसायिक समाजकार्याच्या संदर्भात समुपदेशनाची भूमिका समाजकार्यामध्ये समुपदेशन हे प्रत्येक क्षेत्रात आरोग्य, शिक्षण, कुटुंब, मानसिक आरोग्य, पुनर्वसन, न्यायव्यवस्था — महत्त्वाची भूमिका बजावते. समाजकार्यकर्ता समुपदेशक म्हणून: क्लायंटशी विश्वासपूर्ण नातं निर्माण करतो. क्लायंटच्या भावना, विचार आणि अनुभव समजून घेतो. क्लायंटला स्वतःचे उपाय शोधण्यास मदत करतो (self-help approach). तटस्थता, गोपनीयता आणि आदर या मूल्यांचा अवलंब करतो.



Smt. R.D. Patil Social Work College College Code 225 AKOLA
Scanned with OKEN Scanner

समुपदेशन हे व्यावसायिक समाजकार्याचे मुख्य कौशल्य (Core Skill) आहे. ते व्यक्तीला स्वतःची जाणीव, आत्मविश्वास आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करून सशक्त बनवते. समाजकार्यकर्ता "मार्गदर्शक नव्हे, तर सहप्रवासी" म्हणून व्यक्तीच्या बदल प्रक्रियेत सहभागी असतो.

२) मनोरुग्णांसाठी सेवा :

मनोरुग्ण (Mentally ill persons) म्हणजे अशा व्यक्ती ज्यांच्या विचार, भावना आणि वर्तनामध्ये असंतुलन निर्माण होऊन त्यांना दैनंदिन जीवन, संबंध आणि निर्णयक्षमतेत अडचणी येतात. व्यावसायिक समाजकार्य या समस्येकडे मानवी हक्क, मानसिक आरोग्य आणि सामाजिक पुनर्वसन या दृष्टिकोनातून पाहते.

व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांची भूमिका (Role of Social Worker with Mentally Ill Persons) उपचारात्मक भूमिका (Therapeutic Role) समुपदेशन (Counselling) — रुग्णाला भावनिक आधार देणे. डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ आणि परिचारिका यांच्याशी समन्वय साधणे. उपचार प्रक्रिया समजावून देणे आणि नियमित उपचारासाठी प्रोत्साहन देणे. कुटुंबावर काम (Family Intervention) कुटुंबातील सदस्यांना मानसिक आजाराचे स्वरूप समजावून सांगणे. कुटुंबात स्वीकारभाव आणि सहकार्य निर्माण करणे. पुनर्वसनात्मक भूमिका (Rehabilitation Role) रुग्णाला उपचारानंतर पुन्हा समाजात समाविष्ट करणे. रोजगार प्रशिक्षण, स्वयंरोजगार, कौशल्यविकास उपक्रम राबवणे. समुदायस्तरावर भूमिका (Community Role) मानसिक आरोग्याविषयी जनजागृती मोहीम. ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणे. NGO आणि स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधणे. संशोधन व धोरणात्मक भूमिका (Research & Advocacy Role) मानसिक आरोग्य सेवांवर संशोधन करणे. शासनाकडे धोरणात्मक सूचना देणे (policy advocacy). इत्यादी भूमिका व्यावसायिक समाजकार्य करते.

समाजकार्यकर्त्याचे काम म्हणजे — उपचार प्रक्रियेत सहभागी होऊन रुग्ण आणि समाज यांच्यात पूल तयार करणे.मानसिक आजारांनी ग्रस्त व्यक्तींना समाजात बहिष्कृत केले जाते. समाजकार्यकर्ते मानसोपचार तज्ज्ञांसोबत काम करून रुग्णांचे पुनर्वसन करतात. मनोरुग्णालये, डे-केअर सेंटर, पुनर्वसन केंद्रे यामध्ये समाजकार्यकर्त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असते.

३) व्यसनमुक्ती :

व्यसन (Addiction) म्हणजे एखाद्या व्यक्तीला दारू, तंबाखू, गांजा, औषधे किंवा इतर कोणत्याही पदार्थाच्या वापरावर शारीरिक व मानसिक अवलंबित्व निर्माण होणे. ही केवळ वैयक्तिक समस्या नसून एक सामाजिक, मानसिक आणि आर्थिक समस्या आहे. व्यावसायिक समाजकार्य (Professional Social Work) या समस्येकडे उपचार, पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्स्थापनेच्या दृष्टिकोनातून पाहते. मद्यपान, धूम्रपान, अमली पदार्थ यामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. समाजकार्यकर्ते व्यसनमुक्ती केंद्रांमध्ये समुपदेशन, गटचर्चा, प्रशिक्षण, कुटुंबाशी संवाद साधून व्यसनाधीनांना नवजीवन देतात.

व्यावसायिक समाजकार्याची भूमिका (Role of Professional Social Work) प्रतिबंधात्मक भूमिका (Preventive Role) शाळा, महाविद्यालये आणि समाजात व्यसनविरोधी जनजागृती मोहीम. युवकांमध्ये आरोग्यदायी सवयी व जीवनमूल्यांचा प्रचार. उपचारात्मक भूमिका (Therapeutic Role) समुपदेशन (Counselling) — व्यक्तीच्या भावनिक आणि मानसिक आधारासाठी. गट उपचार (Group Therapy) — समान अनुभव असलेल्या व्यसनमुक्त व्यक्तींसोबत चर्चा. वैद्यकीय उपचार आणि मानसोपचार तज्ज्ञांशी समन्वय. पुनर्वसनात्मक भूमिका (Rehabilitative Role) व्यसनमुक्तीनंतर पुनःसमाजात समाविष्ट होण्यासाठी मदत. रोजगार, शिक्षण आणि सामाजिक समर्थन मिळवून देणे. कुटुंबाला व्यसनमुक्त व्यक्तीच्या पुनर्वसनात सहभागी करणे. संशोधन व धोरणात्मक भूमिका (Research & Advocacy Role) व्यसनाच्या कारणांवर आणि सामाजिक परिणामांवर संशोधन. सरकार व NGO कडे व्यसनमुक्तीसाठी धोरणात्मक सूचना देणे.



Patil Social Work College ... Code

Scanned with OKEN Scanner

४) आत्महत्या प्रतिबंध :

आत्महत्या (Suicide) म्हणजे एखाद्या व्यक्तीने जाणूनबुजून स्वतःचे जीवन संपविण्याचा प्रयत्न करणे. ही केवळ वैयक्तिक समस्या नसून मानसिक, सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक घटकांशी निगडित एक गंभीर सामाजिक समस्या आहे. व्यावसायिक समाजकार्य या समस्येकडे मानसिक आरोग्य, सामाजिक समर्थन आणि सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून पाहते.नैराश्यामुळे अनेक युवक आत्महत्या करतात. समाजकार्यकर्ते हेल्पलाइन सेवा, तणाव व्यवस्थापन शिबिरे, समुपदेशन आणि मानसिक आरोग्यविषयक जनजागृतीद्वारे आत्महत्या प्रतिबंधासाठी काम करतात.

व्यावसायिक समाजकार्याची भूमिका (Role of Professional Social Work in Suicide Prevention)

1 प्रतिबंधात्मक भूमिका (Preventive Role) शाळा, महाविद्यालये आणि कार्यस्थळांवर मानसिक आरोग्य जनजागृती. ताण-व्यवस्थापन, आत्मविश्वास आणि जीवनकौशल्य प्रशिक्षण (Life Skills Training). आत्महत्येची चिन्हे (Warning Signs) ओळखणे आणि योग्य वेळी हस्तक्षेप करणे.

2 उपचारात्मक भूमिका (Therapeutic Role) समुपदेशन (Counselling) – भावनिक आधार आणि सुरक्षित वातावरण देणे. आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या व्यक्तीचे क्रायसिस इंटरव्हेन्शन (Crisis Intervention). कुटुंबीयांना परिस्थिती समजावून घेण्यासाठी कुटुंब समुपदेशन.

3 पुनर्वसनात्मक भूमिका (Rehabilitative Role) आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींना पुन्हा समाजात समाविष्ट करणे.रोजगार, शिक्षण आणि सामाजिक आधार उपलब्ध करून देणे. आत्मविश्वास आणि जीवनातील उद्दिष्टे पुन्हा निर्माण करण्यासाठी मदत.

4 समुदायस्तरावर भूमिका (Community Role) "Suicide Helplines", NGO व स्वयंसेवी संस्थांशी समन्वय. ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा पोहोचवणे. समाजात "आत्महत्या" विषयी असलेले कलंक दूर करणे.

5 धोरणात्मक भूमिका (Policy & Advocacy Role) शासनाकडे आत्महत्या प्रतिबंधासाठी प्रभावी धोरणे आणि हेल्पलाइन केंद्रे उभारणीसाठी मागणी. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम (NMHP) आणि जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम (DMHP) अंतर्गत प्रयत्न.

आत्महत्या प्रतिबंध ही केवळ वैद्यकीय किंवा कायदेशीर प्रक्रिया नसून — मानवी जीवन व मानसिक आरोग्य जपण्याची सामाजिक जबाबदारी आहे. व्यावसायिक समाजकार्याचा दृष्टिकोन व्यक्तीच्या सन्मान, आत्मविश्वास आणि पुनर्वसनावर केंद्रित असतो. समाजकार्यकर्ता म्हणजे त्या व्यक्तीसाठी — "आशेचा हात आणि जगण्याची प्रेरणा." आहे.

५) शालेय मानसिक आरोग्य :

विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाचा ताण, स्पर्धा, करिअरची चिंता, परीक्षाभय यांसारख्या मानसिक समस्या वाढल्या आहेत. शाळा समाजकार्यकर्ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांचे व्यक्तिमत्त्व विकास घडवतात.

सामाजिक आणि मानसिक क्षेत्रातील समाजकार्याची परस्परपूरकता:

सामाजिक समस्या आणि मानसिक समस्या या एकमेकांशी घट्ट जोडलेल्या आहेत. उदाहरणार्थ, गरीबीमुळे मानसिक नैराश्य वाढते, बेरोजगारीमुळे ताणतणाव वाढतो, महिलांवरील अत्याचार मानसिक आघात निर्माण करतात. त्यामुळे सामाजिक व मानसिक क्षेत्रातील समाजकार्य एकत्रितपणे केले जाते. समाजकार्यकर्त्यांना या दोन्ही अंगांचा समन्वय साधून व्यक्ती आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करावे लागते.

भारतामध्ये व्यावसायिक समाजकार्याची गरज :

भारत हा विविध सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेला देश आहे. येथे गरिबी, बेरोजगारी, निरक्षरता, व्यसन, बालमजुरी, स्त्रीभ्रूणहत्या, आत्महत्या, मानसिक आजार, वृद्धांचे प्रश्न इत्यादी समस्या



Social Work College
College Code 225

मोठ्या प्रमाणावर आढळतात. या सर्व समस्यांवर मानवी दृष्टिकोनातून आणि शास्त्रीय पद्धतीने उपाय शोधणारे कार्य म्हणजे व्यावसायिक समाजकार्य (Professional Social Work) होय.

भारतामध्ये व्यावसायिक समाजकार्याची गरज का आहे?

1 सामाजिक समस्यांची गुंतागुंत- भारतामध्ये गरीबी, बेरोजगारी, स्त्रीभ्रूणहत्या, कौटुंबिक हिंसा, व्यसनाधीनता, बालश्रम, आत्महत्या अशा गुंतागुंतीच्या सामाजिक समस्या आहेत. या समस्यांवर केवळ कायदे किंवा योजना पुरेशा नाहीत — त्यासाठी व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांचा मानवकेंद्री दृष्टिकोन आवश्यक आहे.

2 मानसिक आरोग्य आणि समुपदेशनाची गरज- नैराश्य, ताण, आत्महत्या, नातेसंबंधातील तणाव यामुळे समाजात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. समुपदेशक आणि क्लिनिकल समाजकार्यकर्ते व्यक्तीला मानसिक स्थैर्य देतात.

3 सामाजिक न्याय आणि मानवाधिकार संरक्षण- जातीय भेदभाव, लैंगिक असमानता, अपंगत्व, वंचित वर्गाचे हक्क — या क्षेत्रात समाजकार्यकर्ते लोकजागृती आणि हक्कविषयक कार्यक्रम राबवतात.

4 शासकीय आणि स्वयंसेवी क्षेत्रात कार्याची गरज- शासनाच्या अनेक योजना (उदा. बालविकास, महिला कल्याण, वृद्ध सेवा, व्यसनमुक्ती केंद्रे) प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रशिक्षित समाजकार्यकर्त्यांची आवश्यकता असते.

5 आपत्ती व्यवस्थापन आणि पुनर्वसन- पूर, भूकंप, महामारी, आत्महत्या, कोविडसारख्या संकटांमध्ये समाजकार्यकर्त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते — ते मानसिक आधार, पुनर्वसन आणि समुदाय पुनर्बांधणीचे काम करतात.

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या आणि समस्यांनी ग्रस्त देशात व्यावसायिक समाजकार्य हे मानवी विकासाचे अत्यावश्यक साधन आहे. हे क्षेत्र केवळ सेवा देण्यासाठी नाही, तर मानवी सन्मान, सामाजिक न्याय आणि सकारात्मक बदल घडविण्यासाठी कार्य करते. म्हणूनच भारतात प्रत्येक सामाजिक क्षेत्रात व्यावसायिक समाजकार्याची गरज दिवसेंदिवस वाढत आहे.

निष्कर्ष :

सामाजिक आणि मानसिक क्षेत्रातील समाजकार्याची भूमिका अत्यंत व्यापक आणि महत्त्वपूर्ण आहे. समाजकार्य हे केवळ सेवा नसून सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. गरीबी, बेरोजगारी, महिलांचे प्रश्न, बालकांचे हक्क, वृद्धांची उपेक्षा, व्यसनाधीनता, मानसिक ताणतणाव अशा विविध समस्यांच्या निराकरणासाठी समाजकार्यकर्ते सक्रिय असतात. सामाजिक न्याय, समान संधी, मानवी हक्कांचा आदर आणि मानसिक आरोग्य वृद्धी या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी समाजकार्याचा उपयोग होतो. आजच्या जलद बदलणाऱ्या युगात समाजकार्याची गरज अधिक अधोरेखित होते कारण केवळ आर्थिक विकास पुरेसा नाही तर सामाजिक व मानसिक समतोल राखणे हाच खऱ्या विकासाचा पाया आहे.

संदर्भ:

1 समाजकार्याचे तत्त्वज्ञान व क्षेत्रे, डॉ. एस. पी. मंगरुळे, विद्याभारती प्रकाशन, लातूर, 2018
2 समाजकार्य पद्धती आणि प्रक्रिया, डॉ. सुनील जोशी, प्रियदर्शिनी प्रकाशन, नागपूर, 2019
3 मानसिक आरोग्य आणि समाजकार्य, डॉ. शीतल पाटील, साईनाथ प्रकाशन, पुणे, 2020
4 सामाजिक मानसशास्त्र, डॉ. एस. आर. परचुरे, नूतन प्रकाशन, पुणे, 2017
5 समाजकार्य व मानवी वर्तन, डॉ. भीमराव गायकवाड, फडके प्रकाशन, सोलापूर 2021
6 मानसिक आरोग्य : एक सामाजिक दृष्टिकोन, डॉ. माधवी कदम, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, 2016

Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA



Scanned with OKEN Scanner

*Shri Sevadas Shikshan Prasarak Mandal's*

# Jawaharlal Nehru College Of Social Work & Research Centre,

CIDCO, New Nanded (M.S.)

# Maharashtra Association of Social Work Educators (MASWE)

## State Level Seminar

*On*

## Social Work Interventions for Sustainable Development : Opportunities & Challenges

*Tuesday, 07th October 2025*

# CERTIFICATE OF PARTICIPATION

*This certificate is proudly awarded to Dr./Mr./Ms.* Manohar Shamrao Wagatkar

f Smt. Panchfuladevi Patil College of Social Work, Khadki, Akola *in recognition of his/her participation*

*the State Level Seminar on "Social Work Interventions for Sustainable Development: Opportunities & Challenges" jointly organized by Jawaharlal Nehru ollege of Social Work & Research Centre, Nanded & Maharashtra Association of Social Work Educators (MASWE) on 7th October 2025.*

*He / She Chaired the Session/ presented Research Paper on*

शाश्वत सामाजिक विकास आणि लैंगिक संबंध

*Organizing Committee acknowledges and sincerely appreciates his/her valuable contribution and enthusiastic participation in the seminar.*

: Nanded

: 07-10-2025

| Dr. Ambadas N. Kardile | Dr. Narhari G. Patil | Dr. Ambadas Y. Mohite |
| --- | --- | --- |
| Convener | Principal | Founder President, MASWE |

Scanned with OKEN Scanner

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

**October - 2025**

ISSUE No - (DXXX) 530

## Social Work Interventions for Sustainable Development: Opportunities & Challenges






**Chief Editor**
Dr. Virag S. Gawande
Director
Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. Narhari G. Patil

**Editor**
Dr. Ambadas Kardile

Jawaharlal Nehru College of Social Work
CIDCO, Nanded, Maharashtra 431603

**This Journal is indexed in :**

- **Scientific Journal Impact Factor (SJIF)**
- **Cosmos Impact Factor (CIF)**
- **International Impact Factor Services (IIFS)**

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Smt. P.D. Patil Social Work College AKOLA
College Code 225

Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DXXX) 530
ISSN : 2278-9308
October 2025

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Role of Social Legislation in Sustainable Development in India — **Prof. Umesh D Wani** | 1 |
| 2 | Organic Farming and Initiatives of AWARD in Sustainable Development — **Dr. Vijay Jaysing Mane** | 3 |
| 3 | Learning in Inequality: Digital Exclusion of Tribal and Rural Students in Maharashtra — **Prashant Vikas Karale** | 8 |
| 4 | Transgender Community Inclusions in Sustainable Development Goals Implementation: Barriers and Strategies — **Chitra Sharad Thanage,,Dr. Shaikh Asifoddin Ainoddin,** | 13 |
| 5 | Social Work Intervention in Mental illness For Sustainable Development Goals — **Dr.Narhari Patil** | 16 |
| 6 | Integrating Mental Health into the Sustainable Development Goals: A Social Work Perspective on Addressing a Neglected Priority — **Dr. Shaikh Asifoddin Ainoddin** | 19 |
| 7 | Use of Virtual Reality in Social Work Counseling for Traumatized Children — **Nilesh Devising Rathod** | 27 |
| 8 | Workplace Stress and Its Impact on Mental Health: Challenges and Social Work Interventions — **Dr. S. N. Bhadarge** | 31 |
| 9 | A Study on Social Work Intervention in Disaster Management — **Dr. Shinde Shivaji Sambhaji** | 34 |
| 10 | Mental Health, Family Functioning, and Quality of Life among Parents of Children with Intellectual Disability: A Cross-Sectional Study — **Ms.Pranita Pandit Barge1 ,Dr.Shrikant Pawar** | 38 |
| 11 | A Cross-Sectional Study of Occupational Stress and Coping Strategies among Police Professionals in Pune — **Mr.Sushil sunil shelke, Dr.Ashwini Dhembare** | 43 |
| 12 | सामाजिक न्याय, समानता व लोकशाही मूल्य वृद्धीसाठी समाजकार्य शिक्षणाची भूमिका — सहा.प्रा.डॉ.हर्षल दादाराव बोरचाटे | 47 |
| 13 | हवामान बदल, आपत्ती व्यवस्थापन व शाश्वततेत समाजकार्य हस्तक्षेप — प्रा. सुरेश आशन्ना कंती | 53 |
| 14 | महिलांचे प्रजनन आरोग्य: आव्हाने आणि उपाय - एक अभ्यास — अरुण विठ्ठलराव शेटे,डॉ. ए.ए.शेख | 58 |
| 15 | सामाजिक व मानसिक आरोग्य क्षेत्रातील समाजकार्याची भूमिका — डॉ. लखन दिगांबर कत्तेवार | 65 |
| 16 | शाश्वत विकासात समाजकार्यातील क्षेत्रकार्याची भूमिका — शिरसे बुध्दभूषण माधवराव | 70 |
| 17 | शाश्वत विकासात शिक्षणाची भूमिका — डॉ. बळवंत पाटील | 75 |
| 18 | शाश्वत सामाजिक विकास आणि लैंगिक समानता — प्रा.मनोहर वागतकर | 80 |
| 19 | शाश्वत गाव विकास संकल्पना आणि समाजकार्य हस्तक्षेप, संदर्भ : पठाण मांडवा, | 85 |





Patil Social Work C

Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DXXX) 530
ISSN : 2278-9308
October 2025

# शाश्वत सामाजिक विकास आणि लैंगिक समानता

प्रा.मनोहर वागतकर
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला.
manoharwagatkar4156@gmail.com
मो. क्र. 98909 72530

**संक्षिप्त गोषवारा (Abstract) :**

भावी पिढीच्या गरजा पूर्ण करण्याच्या पर्यावरणाच्या क्षमतेचा -हास न करता वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करणे म्हणजेच शाश्वत विकास होय. शाश्वत विकास हा पर्यावरणाचा सकारात्मक संवर्धनावर जोर देतो. पर्यावरणामध्ये नैसर्गिक संसाधन आणि मानवी संसाधन यांचा समावेश होतो. नैसर्गिक संसाधने व मानवी संसाधने यांचा योग्य ताळमेळ असल्यास शाश्वत विकास घडून येण्यास मदत होते. या शोधनिबंधात शाश्वत मानवी विकासाकरिता लैंगिक समानता महत्वाची आहे असे मला वाटते म्हणून मी हा विषय निवडला आहे. महिलांना विकासाच्या मुख्यप्रवाहापासून दूर ठेवणे म्हणजे जगाच्या अर्ध्या लोकसंख्येला संपन्न समाज आणि अर्थव्यवस्थेच्या निर्मितीमध्ये असणाऱ्या त्यांच्या भागीदारीच्या संधी पासून वंचित ठेवणे होय. स्त्री-पुरूषांच्या बाबतीत शिक्षण, आरोग्य, आर्थिक, सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक असमानता म्हणजे लैंगिक असमानता होय. प्रस्तुत शोधनिबंधात आर्थिक, सामाजिक व राजकीय लैंगिक असमानता विचारांत घेवून विवेचन केले आहे. तसेच लैंगिक समानता आणण्याकरिता नियोजन काळात करण्यात आलेले प्रयत्न व कायदेविषयक उपाययोजना सुध्दा सुचविल्या आहेत. शोधनिबंधाकरिता दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे.

**बीजशब्द :** शाश्वत विकास, लैंगिक समानता, सक्षमिकरण

## प्रस्तावना :

लैंगिक असमानता मानव इतिहासात अन्यायाचे एक निरंतर आणि व्यापक रूप आहे. म्हणून त्यात परिवर्तन करण्याकरीता मोठया आंदोलनाची आवश्यक्ता आहे. विश्वातील सर्वच ठिकाणी महिलांना आज सुध्दा भेदभाव व हिंसा सहन करावी लागत आहे. लैंगिक असमानता आणि त्यांची सामाजिक कारणे, स्त्री - पुरूष गुणोत्तर, स्त्रियांचे आरोग्य, शैक्षणिक प्राप्ती याचा आर्थिक परिस्थितीवर परिणाम होतो. भारतीय राज्यघटनेने पुरूष आणि स्त्रियांना समान हक्क आणि अधिकार दिले असले तरी स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे झाले, लैगिंक असमानता दूर करण्याकरिता प्रयत्न केले जात असले तरी लैंगिक असामानता कायम आहे. लैंगिक असमानता दुर करणे मानव समाजासमोर एक आव्हान आहे. भारतात आर्थिक बाबतीत स्त्रियांना पुरूषापेक्षा दुय्यम स्थान आहे. स्त्री लहानपणी वडिलावर, तरुणपणी नवऱ्यावर तर म्हातारपणी मुलावर अवलंबून असते. आर्थिक बाबतीत बहुतेक कुटुंबात निर्णय घेण्याचा अधिकार पुरूषाकडेच असतो.

## आर्थिक असमानता :

भारतातील सामाजिक परिस्थितीत लैंगिक असमानता सम्मिलीत आहे हे अनेक क्षेत्रात दिसून येते. जसे शिक्षण घेण्यापासून सामाजिक, आर्थिक व राजकीय संधी पर्यंत लैंगिक समानता आणि न्यायाकरिता भारतात कायदयावर अवलंबून राहावे लागते. ते सुध्दा नियोजन काळात लागू झालेत व त्याची अंमलबजावणी काटेकोर होतांना दिसून येत नाही. महिलांना सामाजिक, आर्थिक आणि कायदयानुसार परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा



D. Patil Social Work Co

Scanned with OKEN Scanner

झालेल्या असल्यातरी अजूनही कायदयात पळवाटा असल्यामुळे लैंगिक असमानता दिसून येते. जोपर्यंत पुरुषप्रधान संस्कृतीची मानसिकता बदलत नाही तोपर्यंत लैंगिक समता प्रस्तापीत होणार नाही. आपल्याला अनेक स्तरावर लैंगिक असमानता दिसून येते. जसे-

१. गर्भातच भेदभाव सुरू होत असून लिंग चाचणी व कन्याभ्रुण हत्याबाबत भेदभाव.
२. मुलींना पोषण आहार देण्याच्या बाबतीत भेदभाव.
३. मुलांच्या तुलनेत मुलींना शाळेत शिक्षण देण्याबाबत भेदभाव.
४. उच्च शिक्षण देण्याबाबत भेदभाव
५. रोजगार संधी व मजुरी दरात भेदभाव
६. वडिलोपार्जित संपत्तीत समान हिस्सा मिळण्यात भेदभाव

अशा अनेक स्तरावर लैंगिक असमानता किंवा भेदभाव केला जातो. असे अनेक भेदभाव दूर करण्याकरिता समाज आणि सरकार कायदयावर अवलंबून असते. कायदयामध्ये अनेक अडचणी येतात. महत्वाचे म्हणजे न्याय मिळण्याकरिता मोठा कालावधी लागतो. भेदभावाचे प्रत्यक कृत्य गैरकानुनी आहे तरी पण कायदयानुसार अमलंबजावणी केल्यास व समाज परिवर्तन झाल्यास भेदभाव कमी होण्यास मदत होवू शकते.

देशाच्या आर्थिक विकासाबरोबरच आपल्या राहणीमानाचा दर्जा टिकवून ठेवता यावा, कुटुंबाला आर्थिक मदत व्हावी व आपल्या श्रमाचा देश विकासाकरिता मदत व्हावी म्हणून महिला कामाच्या निमित्ताने घराबाहेर पडतात. त्यांना श्रमाबद्दल मजूरी किंवा वेतन म्हणून मोबदला मिळतो. औद्योगिक विकासाच्या आधारावर विविध देशात मजुरी दर भिन्न-भिन्न असल्याचे दिसून येतात. विकसीत देशात मजुरी दर जास्त तर आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या देशात मजुरी दर कमी तसेच ज्या उद्योगाची देय क्षमता जास्त असते. ते मजुरांना जास्त मजुरी देवू शकतात तर ज्या उद्योगात देय क्षमता कमी अशा उद्योगात मजूरी दर कमी असते. देश किंवा उद्योगा बरोबरच लैंगिक आधारवर मजूरी दरामध्ये भेदभाव दिसून येतो. संघटीत क्षेत्रात मजुरी किंवा वेतन दर समान असले तरी असंघटीत क्षेत्रात मात्र ते भिन्न आहेत. स्त्री कामगाराला पुरूष कामगारापेक्षा कमी मजुरी दिली जाते. हे भारत देशातच नाही तर जगातील अनेक देशात दिसून येते. स्त्रियांना पुरूषांपेक्षा कमी मजुरी देण्याची कारणे पुढील प्रमाणे दिसून येतात.

१. महिलांमध्ये शारीरिक आणि मानसिक परिश्रम करण्याची शक्ती कमी असते असे वैद्यानिक अनुभवातून हया गोष्टीचे समर्थन करतात.
२. महिला कामगाराकरिता कार्यक्षेत्र मर्यादित असते. साधारणत: अकुशल कार्याकरिता महिला कामावर लावल्या जातात त्यामुळे महिला कामगारांची मागणी व मजुरी कमी असते.
३. बरेचदा महिला एखादे कार्य नियमित करू शकत नाहीत. बऱ्याच महिला विवाहानंतर कार्य करणे सोडतात. विवाहानंतर किंवा मूल होण्यच्या पूर्वी व नंतर कार्य करणे सोडावे लागते त्यामुळे त्यांच्यावर प्रशिक्षण व इतर खर्च लाभदायक नाही असे उद्योजकाला वाटते.
४. पुरूष कामगारापेक्षा महिला कामगार संघटीत नसतात त्यामुळे त्या असंघटीत असल्यामुळे आपली मजूरी वाढवून घेण्यात असमर्थ ठरतात.
५. महिलावर अनेक सामाजिक प्रतिबंध आहेत. अनेक कार्य त्यांना वर्जीत आहेत. जसे कंपनी कायदयानुसार महिलांना रात्रपाळीत काम करण्यास प्रतिबंध आहे.
६. महिला श्रमिक, पुरूष श्रमिकासारखे आपले अधिकार व हक्काच्या बाबतीत संर्घष करीत नाहीत त्यामुळे सुध्दा पुरुषांपेक्षा कमी मजुरी देण्यात येते.

या कारणावरून स्पष्ट होते की, महिलांना पुरूषांपेक्षा कमी मजुरी दिली जाते. परंतु आधुनिक काळात महिलांमध्ये शिक्षणाच्या प्रचारामुळे, महिलामध्ये झालेल्या जागृतीमुळे महिला व पुरूष कामगारांना समान मजुरी देण्यात यावी म्हणून मागणी करण्यात येत आहे. आपले संविधान सुध्दा समान कामाकरिता समान वेतनाचे समर्थन करते मग ते कार्य करणारा महिला कामगार असो की पुरुष कामगार. विकसीत देशात महिला संघटीत होत आहे. महिला संघटना सुदृढ होत आहेत. महिलावरील सामाजिक प्रतिबंध कमी होत आहेत त्याचा परिणाम महिलांच्या मजुरीत वाढ होत आहे. समाजवादी देशात तर महिला पुरूषापेक्षा कोणत्याही कामात मागे नसते. असे असले तरी सर्व व्यवसाय आणि उद्योगात महिला श्रमिकांना कमी मजुरी देण्यात येते. काही व्यवसाय तर निसर्गाच्या दृष्टीने असे असतात की महिला श्रमिक अधिक उपयुक्त असतात. तसेच पुरूष श्रमिकापेक्षा महिलांना अधिक मजूरी दिली जाते. रोजगार व रोजगारांच्या संधी आणि समान वेतन अधिनियम, १९७६ च्या अनुसार महिला व पुरूष श्रमिकांना समान वेतन देण्याचे प्रावधान केले आहे. परंतु आजही संघटीत क्षेत्रापेक्षा असंघटीत क्षेत्रात वेतन किंवा मजुरी दरात भेदभाव करीत असलेले दिसून येते.

भारतातील उद्योजकांपैकी ७ टक्के महिला तर ९३ टक्के पुरूष उद्योजक आहेत. एका अभ्यासानुसार महिला उद्योजकांना वेगवेगळया कारणांमुळे त्यांच्या कार्याच्या विकासामध्ये अनेक अडथळयांचा सामना करावा लागतो. महिलांना उद्योजक बनविण्याकरिता सरकार कडून अनेक मदत केली जाते. आर्थिक, तांत्रिक, बाजारपेठे बाबत मदत पुरविण्याचे काम सरकारी योजनांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. लहान लहान उद्योग करण्याकरिता बचत गटांच्या माध्यमातून कर्जपुरवठा व इतर तांत्रिक मदत महिलांना देण्याचे प्रयत्न होत आहेत. व्यवसायात कितीही महिला पुढे जात असल्या तरी व्यवसायीक निर्णय घेतांना महिलांसमोर बऱ्याच अडचणी येतात.

**समाजिक असमानता :**

समृध्द आणि भरभराटीला आलेल्या समाजात महिला आणि पुरूषांना त्यांच्या मानवी हक्कांची समान संधी असते. सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाकरिता महिला आणि पुरूष योगदान देतात. सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाचा थेट संबंध राजकीय, राष्ट्रीय आणि आर्थिक विकासाशी आहे. परंतु लैंगिक असमानता सामाजिक आर्थिक विकास प्रतिबंधित करते. विशेषत: विकसनशील देशांमध्ये असमानता असल्यामुळे आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासावर विपरित परिणाम घडवून आणतो. समाजात शाश्वत विकास हा पुरुष आणि स्त्रियांच्या समान योगदानावर आवलंबून असतो. महिलांनी त्यांच्या समाजातील प्रगतीमध्ये समान सहभाग घेण सुनिश्चित करण्यासाठी दोन प्रमुख घटकांची आवश्यकता आहे. एक म्हणजे देण्यात येणाऱ्या योगदान देण्याची समान क्षमता असावी व दुसरे म्हणजे योगदान देण्याकरिता समान संधी असावी लागते. त्याकरिता महिलांची स्थिती सुधारण्याकरीता शिक्षण, आरोग्य, निर्णय सहभाग यामध्ये महिलांची स्थिती सुधारली जाणे आवश्यक आहे. सामाजिक विकासाकरीता योग्य व न्याय भूमिका घ्यावी यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जाणे आवश्यक ठरते. लैंगिक असमानता कमी करणे स्त्रियांचे काम नाही तर पुरूष, मुले आणि वृध्द तसेच गरीब व श्रीमंताचे सुध्दा काम आहे. यामधुनच समाजविकास घडून येतो. त्यामुळे लैंगिक समानता प्रस्तापित करणे त्या देशातील सर्वाचे कर्तव्य ठरते.

**राजकीय असमानता :**

भारतात राजकीय क्षेत्रात लैंगिक असमानता दिसून येते. संविधानानुसार महिलांना मतदान करण्याचा समान अधिकार असला तरी राजकीय सहभाग आजही अत्यत मर्यादीत आहे. राजकीय क्षेत्रात पुरूषांचेच वर्चस्व आहे. महिला आरक्षणामुळे राजकारणात महिलांची सहभाग वाढत असला तरी आजही निर्णय मात्र पुरूषांकडूनच घेतले जातात असेही दिसून येते. जो पर्यंत पुरूषांची मानसिकता बदलत नाही तोपर्यंत राजकीय क्षेत्रात लैंगिक समानता येणे शक्य नाही.

Principal R.D. Patil Social Work College, College Code 225



Scanned with OKEN Scanner

भारतात लैंगिक समानतेकरीता करण्यात आलेले प्रयत्न :

नियोजन काळात महिलांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय स्वरूपात विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने भारताच्या संविधानात विशेष प्रयत्न केले गेले. केंद्र व राज्य शासनाद्वारे अनेक कायदे व अधिनियम तयार करून त्यांची अंमलबजावणी करण्यात आली. तसेच महिलांच्या कल्याणाकरिता आणि त्यांच्या विकासाकरिता अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. भारताच्या संविधानात लैंगिक असमानता दूर करून महिलांच्या सर्वांगीण विकास आणि त्यांना संरक्षण देणाऱ्या धोरणांचा अंगीकार करण्यात आला. घटनेच्या कलम १४ मध्ये राजकारण, अर्थकारण, समाजकारण या क्षेत्रामध्ये समान हक्क आणि समान संधी, कलम १५(२) मध्ये महिलांना लिंग भेदाने वागविण्यावर बंदी, १५ (३) शासकीय योजना आणि कार्यक्रम यामधून महिलांना झुकते माप, कलम ३९ मध्ये महिलांसाठी उपजिविकेची साधने समान हक्काने उपलब्ध करून देणे तसेच समान कामासाठी समान वेतन देणे. कामाच्या ठिकाणी महिलांना न्याय आणि मानवतावादी दृष्टीकोण ठेवून वागविणे. तसेच प्रसुती काळात विशेष सवलती देणे अशी विविध कायदे संविधानात लैंगिक समानतेकरिता करण्यात आले तसेच महिलांच्या दृष्टीकोणातून अनेक कायदे अंमलात आणले गेले. बालविवाह कायदा १९२९, हिंदू विवाह कायदा १९५१, मळ्यामधून काम करणाऱ्या महिला मजुरासंबंधीचा कायदा १९५१, महिलांना अनैतिक धंद्यात ओढण्या बद्दलचा प्रतिबंधक कायदा १९५६, प्रसुतीकाळ सवलती कायदा १९६१, हुंडाविरोधी प्रतिबंध कायदा १९६१, वेठबिगारी महिला मजूर प्रतिबंधक कायदा १९७६, कौटुंबिक अत्याचारापासून महिलांना मुक्त करणे, संरक्षक कायदा १९७९, घटस्फोट कायदा १९६९, परिवार न्यायालये कायदा १९८४, वारसदार कायदा १९८५, सती प्रथा कायदा १९८७, गर्भधारणे संबंधीतील वैद्यकीय निदान तंत्र गैरवापर प्रतिबंधक आणि नियम बंधने कायदा १९९८, तसेच नुकताच करण्यात आलेला तीन तलाख कायदा असे अनेक कायदे महिलांच्या संदर्भात आर्थिक, सामाजिक आणि सुरक्षेच्या दृष्टीकोणातून करून महिलांचे सक्षमीकरण करण्याचे प्रयत्न भारतात करण्यात आलेले आहेत.

**नियोजन काळात लैंगिक समानता निर्माण करण्याकरिता पंचवार्षिक योजनामध्ये करण्यात आलेल्या तरतुदी:**

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारतात आर्थिक विकासाकरिता नियोजनाला महत्त्व देण्यात आले. पंचवार्षिक योजनांचा लैंगिक समानतेकरिता करण्यात आलेल्या प्रयत्नांचा विचार करणे आवश्यक आहे. प्रथम पंचवार्षिक योजनेत समाजसेवी संस्थांना मदत करण्याकरिता १९५३ साली एका केंद्रीय सामाजिक मंडळाची स्थापना करण्यात आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात आर्थिक विषमता कमी करणे आणि समान वितरण करून देशात समाजवादी समाजव्यवस्था स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तिसऱ्या व चौथ्या योजनात महिलांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यात आले. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने कुटुंब नियोजन केंद्र वाढविण्याकरिता व प्रसुतीपूर्व स्त्री व बाळासाठी आरोग्य सेवा या करिता तरतूद करण्यात आली. पाचव्या पंचवार्षिक योजना काळात महिलांच्या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टीने कल्याणाकडून विकासाकडे असा बदलविण्याचा प्रयत्न करण्यात आला. सहाव्या पंचवार्षिक योजना काळात महिलांचा विकास हा वेगळा आर्थिक विकास आहे हे मान्य करण्यात आले. आरोग्य, शिक्षण व रोजगार या त्रिसुत्री कार्यक्रमावर भर देण्यात आले. सातव्या पंचवार्षिक योजनेत महिलांना राष्ट्रीय विकासाच्या मुख्य प्रवाहात आनून दारिद्रय, बेकारी व प्रादेशिक असमतोल या समस्यावर भर देण्यात आला. या योजनेत मोठी तरतूदही करण्यात आली. आठव्या पंचवार्षिक योजनेत महिला सबलीकरणाला प्राथमिकता देण्यात आली. महिला स्वयं सहाय्यता बचत गट यांचा विकास करणे. महिला सबलीकरणावर भर देवून विकास क्षेत्रावरील खर्चाच्या ३० टक्के निधीचा फायदा महिलांना होईल अशी तरतूद करण्यात आली.

नवव्या पंचवार्षिक योजना काळात महिला सबलीकरण हे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. या योजनेत मोठया प्रमाणात तरतूद करण्यात आली. दहाव्या पंचवार्षिक योजनेत सामाजिक, आर्थिक अधिकार व लिंगभेदरहित न्याय

अशी शिफारशी धोरण सुचविण्यात आले. महिला अर्थसंकल्पात सुरु करण्याचे धोरण ठरविण्यात आले. अकराव्या पंचवार्षिक योजना काळात महिलांच्या विकासाकरिता पाच स्तरीय लिंग समानता फार्मुला सुचविला गेला. आर्थिक आधार, सामाजिक समानता, राजकिय समानता, महिलासंबंधी कायदे यांचा समावेश होता. बाराव्या पंचवार्षिक योजना काळात महिलांकरिता मोठी तरतूद करण्यात आली. महिलांच्या विकासाकरिता अनेक योजना आखण्यात आल्या आहेत. त्याचा परिणामही दिसून येत आहे.

या सर्व पंचवार्षिक योजनेचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, भारतात नियोजनाच्या सुरूवातीच्या काळापासून महिलांच्या विकासाकडे लक्ष दिले गेले असले तरी महिलांचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न सातव्या पंचवार्षिक योजनेपासून झाला असे लक्षात येते. यामुळे महिलांच्या साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाली आहे. राहणीमानाचा दर्जा उंचावून आर्थिक, सामाजिक आणि राजकिय क्षेत्रात प्रगती झाल्याचे दिसून येते. आज अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढला आहे. योजना काळात महिलांच्या आरोग्य, शिक्षण, रोजगार निर्मिती, निवारा या सर्व आवश्यक गरजांकडे लक्ष पुरवून आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्ट्या कशा सबल होईल याकरिता प्रयत्न करण्यात आले. पंचायत राज मुळे आज महिलांना ५० टक्के आरक्षण प्राप्त झाल्याने त्यांचा राजकीय व प्रशासनातील सहभाग वाढला आहे. अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात आज महिला सक्षमपणे काम करीत असल्याचे निदर्शनात येते.

**समारोप :**

देशात लैंगिक समानता आणण्याकरिता महिलांना शारीरिक व मानसिक सक्षम बनविणे आवश्यक आहे. जेव्हा स्त्री निरोगी असते तेव्हा ती अधिक उत्पादक असते. महिला जोपर्यंत सर्व बाबतीत सक्षम होत नाही तो पर्यंत लैंगिक समानता येणे शक्य नाही. त्यामुळे महिला सक्षमीकरण करणे जरूरीचे आहे. महिलांना आर्थिक, सामाजिक व राजकीय सहभागात सामावून घेणे गरजेचे आहे. महिला सक्षमीकरण होणे शाश्वत मानवी विकासाकरिता अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भसूची :**

- प्रकाश नारायण नादाणी, महिला जागृती और कानून आविष्कार पब्लीशर्स डिस्ट्रीब्यूटर्स, जयपूर २००२
- डॉ. मेघा कानेटकर, भारतीय नियोजनाची पन्नास वर्ष, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर २००७
- डॉ. सुभाषचंद्र गुप्ता, कार्यशील महिला एव. भारतीय समाज, २००३
- Swamalata Warke, Editor. Gender Budgeting an Instrument for Women's Empowerment and Economic Security, National Seminar, 2012
- https://en.wikipedia.org/wiki/Gender_inequality_in_India#cite_note-weforum2013india-

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Principal,
Smt. Panchfuladevi Patil College Social Work, Khadki, Akola (M.S)



Scanned with OKEN Scanner